MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा



वर्ष पंधरावे / अंक ७ / जुलै २०१४

## संपादकीय

### सांस्कृतिक बधिरता

धरणीकंप, त्सुनामी, वादळे, ज्वालामुखी, अतिवृष्टी इत्यादी नैसर्गिक प्रकोपांमुळे मानवाचे आणि त्यानेच निर्माण केलेल्या भौतिक जगाचे प्रचंड नुकसान होत असते. यामध्ये मानव आणि संस्कृतीचा प्रचंड विध्वंस होतो. ही प्रक्रिया सृष्टीच्या निर्मितीपासूनच चालू आहे. सिंधू संस्कृतीपासून अनेक अतिप्राचीन संस्कृती या अशाच नैसर्गिक प्रकोपांमुळे नष्ट झाल्या असाव्यात असा अभ्यासकांचा कयास आहे. आधुनिक माणसाच्या जीवनशैलीमुळे पर्यावरणामध्ये येणारे असंतुलनही हवामानामध्ये अनपेक्षित बदल करीत असते. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ, यांमुळेही सार्वजनिक मालमत्ता आणि पर्यायाने संस्कृतीचा विध्वंस होतच असतो. या नैसर्गिक घटनांचे वैज्ञानिक विश्लेषण कदाचित त्याचे कारण दाखवू शकेल, पण त्यामुळे होणारी हानी मात्र टाळता येणे अशक्य असते.

सांस्कृतिक विध्वंसाचे दुसरे महत्त्वाचे कारण मात्र मानवनिर्मित आहे, आणि ते म्हणजे लढाया. अलेक्झांडरच्या आक्रमणापासून ते अगदी सध्या सीरियामध्ये चालू असलेल्या युद्धामुळे संस्कृतीची प्रचंड हानी झालेली दिसते. या लढायांना जर का धर्माचे अधिष्टान असेल तर हा सांस्कृतिक विध्वंस अधिकच तीव्र असतो. इजिप्तमधील ॲलेक्झांड्रियाचे ग्रंथालय काय किंवा नालंदाचे ग्रंथालय काय, मूलतत्त्ववाद्यांच्या कारवायांमुळे अनेक महिने जळत होते. आपल्याकडील काशीविश्वेश्वराचे मंदिर, गुजरातमधील सोमनाथ मंदिर, काश्मीर आणि उत्तर भारतातील शेकड्यांनी मंदिरे, इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी जमीनदोस्त केल्याचे स्वतःच लिहून ठेवले आहे. बाराव्या ते चौदाव्या शतकांमध्ये इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मयुद्धांमुळे अशीच प्रचंड सांस्कृतिक हानी, सीरिया, स्पेन आणि पोर्तुगालमध्ये केली गेली. हा सगळा इतिहास झाला.

चौदाव्या शतकात युरोपमध्ये प्रबोधनाचे युग चालू झाले. कलेपासून विज्ञानापर्यंतच्या विकासाला एक नवीन दिशा मिळाली. युरोपमधील वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांती त्यामुळेच शक्य झाली. विसंवादापेक्षा संवाद आणि सहिष्णुतेकडे विचारवंतांचा कल झुकू लागला. यामागची पार्श्वभूमी ही ख्रिस्ती आणि इस्लामधील धर्मयुद्धाचीच होती. युरोपमध्ये स्पेन, पोर्तुगाल ही राष्ट्रे आलटून पालटून धर्म आणि त्यामुळे सांस्कृतिक बदल अनुभवत होती. बाराव्या शतकामध्ये स्पेन पुन्हा ख्रिश्चनांनी जिंकले आणि टोलिडो येथील ग्रंथालयाचा विध्वंस करण्याऐवजी तेथील पर्शियन व अरेबिक तत्त्वज्ञान

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

आणि विज्ञानाच्या ग्रंथाच्या भाषांतराचे एक नवीन युग निर्माण झाले. युरोपमधील प्रबोधनाची ती पार्श्वभूमी होती. युरोपमधील वैज्ञानिक क्रांतीची बहुतेक सर्व मूलतत्त्वे ही अरेबिक, परशियनमधून लॅटिनमध्ये झालेल्या विज्ञान विचारांमुळे होती. सांस्कृतिक विध्वंसापेक्षा त्याचे संवर्धन मानवाला अधिक हितकारक असते याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण होते.

सातव्या शतकात भारतीय गणित आणि वैद्यक ग्रंथांची भाषांतरे पूर्व आणि मध्यपूर्व आशियामध्ये व्हायला लागली. वास्तविक इराणमधील गुंडिशापूर येथील ज्ञानकेंद्रामध्ये भारतीय आणि ग्रीक ज्ञानग्रंथांचे भाषांतर या अधिक चालू झाले होते. 'बूर्ज्झा' या अभ्यासकाने भारतभर भ्रमण करून 'पंचतंत्र' हा ग्रंथ गुंडिशापूर येथे नेऊन तेथे त्याचे पहलवी भाषेत त्याचे भाषांतर केले. यानंतर पंचतंत्राचे जगातील सर्व प्रमुख भाषांमध्ये भाषांतर झाले, आणि पंचतंत्राच्या गाभ्यातूनच युरोपमधील अनेक नीतिकथा उदयास आल्या. आठव्या, नवव्या शतकामध्ये गुंडिशापूर येथील हे ज्ञानकेंद्र इराकमधील बगदाद येथे स्थलांतरित झाले. पुन्हा एकदा भारतीयांची गणितावरील पुस्तके तेथे भाषांतरित झाली. जगाला 'शून्य' आणि आकड्यांची ओळख या भाषांतरांतूनच मिळाली.

जो प्रकार मध्यपूर्व आशियात घडत होता तोच प्रकार हिमालयाच्या उत्तरेकडील मध्य अशियामधील देशांमध्ये होत होता. बौद्ध धर्माच्या प्रसाराबरोबरच अनेक भारतीय वैज्ञानिक ग्रंथांचेही भाषांतर या मध्य आशियातील देशांमध्ये व्हायला लागले. चीनमध्ये तर हा सांस्कृतिक वारसा आधीच पोहोचला होता. रशियाचे अफगाणिस्तानावरील आक्रमण आणि मध्य आशियामधील देशांवरचा त्याचा ताबा या घडामोडींमधून खरोष्ठी, ब्राह्मी लिपीमधून लिहिलेली अनेक हस्तलिखिते स्कँडिनेव्हियन देशांमध्ये पोहोचली असून त्यांचा अभ्यास तेथे सुरु आहे. सांस्कृतिक सहिष्णूता आणि संस्कृती जपण्याच्या संवेदनेतून या घटना घडू शकतात.

दुर्दैवानी अफगणिस्तानापासून बगदादापर्यंत जेथे संस्कृतीच्या आदानप्रदानामुळे मानवी विचारांना नवीन दिशा मिळाली, तेथेच युद्धामुळे या संस्कृतींचा विनाशही आपल्याला पाहावा लागत आहे. अफगाणिस्तानमधील बामियान येथील चौथ्या/पाचव्या शतकातील बुद्धाच्या प्रचंड मूर्तींचा इस्लामीक मूलतत्त्ववाद्यांनी केलेला विध्वंस आणि याच धर्मांध शक्तींनी काबूल येथील संग्राहलयातील वस्तूंची केलेली नासधूस या घटना मानवतेला काळिमा फासणाऱ्या आहेत. अफगाणिस्तानमध्ये तालिबानच्या झालेल्या पाडावा नंतर मुंबईच्या म्हाळगी प्रबोधिनीतर्फे डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय अभ्यासकांचा पहिला गट अफगाणिस्तानला गेला होता. या गटामध्ये सामील होण्याचे भाग्य मला मिळाले होते. यामुळे बामियान आणि काबूलमधील हा विध्वंस प्रत्यक्ष बघता आला. जगातील सर्वांत जुनी म्हणजे सहाव्या शतकातील गणपतीची मूर्ती काबूलमधील एक मंदिरात लपवून ठेवलेली पाहता आली. तालिबान्यांनी सबंध अफगाणिस्तानमध्ये विध्वंस केलेल्या हिंदू, बौद्ध मूर्तींही तेथील नव्या सरकारने एका गोदामामध्ये भरून ठेवलेल्या बघता आल्या. २००१ साली जे अफगाणिस्तानमध्ये घडले त्यापेक्षाही वाईट अमेरिकेने इराकमध्ये सुरू केलल्या युद्धामुळे २००३ साली बगदाद आणि मोसूलमध्ये घडले. बगदाद आणि मोसूल येथील राष्ट्रीय

(पृष्ठ क्र. २० वर)

व्ही.पी.एम्.
# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

**वर्ष पंधरावे / अंक ७ / जुलै २०१४**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १९ वे/अंक १ ला)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | नॅनजिंग येथील जहाज संग्रहालय | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | नर्मदा परिक्रमा (भाग :६) | श्री. अरविंद ओक | ७ |
| ४) | भारतीय संस्कृती–बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १२ |
| ५) | चिल्का सरोवराचे नवे समुद्रमुख | श्री. नरेंद्र गोळे | २१ |
| ६) | 'दिशा', 'दिशांतून भास तूझा रे' | श्रीमती आशा भिडे | २३ |
| ७) | श्रीमद् भगवद्गीता – अध्याय अठरावा संन्यास योग – कळसाध्याय | कै. शं. बा. मठ | २४ |
| ८) | चैत्र मास | नचिकेत सुगवेकर | ३० |
| ९) | 'संस्कृत' – जागतिक दर्जाची भाषा | रेवती मिलिंद कुलकर्णी | ३१ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.

❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.

❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.

❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.

❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.

❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.

❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे – ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२–२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.

❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.

❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.

❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/– चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

– संपादक

# नॅनजिंग येथील जहाज संग्रहालय

*चीनमधील नॅनजिंग शहरातील जहाज संग्रहालयाची माहिती देणारा लेख – संपादक*

किशोरांसाठी आयोजित केलेल्या नवनिर्मिती स्पर्धेत भाग घेण्याच्या निमित्ताने चीनमधील नॅनजिंग या शहरात जाण्याचा योग आला. या शहराबद्दलची माहिती याआधीच्या लेखात दिलेलीच आहे. संधी मिळाली की प्रेक्षणीय स्थळे बघणे हा आमचा स्वभाव आहे. त्यानुसार, नॅनजिंगमधील काही महत्त्वाच्या स्थळांना आम्ही भेटी देऊन आलो. त्यांतील एक स्थळ होते जहाजाचे संग्रहालय. शहरातल्या कोणकोणत्या स्थळांना भेट द्यायची याची आम्ही एक यादीच बनविली होती. त्या मूळ यादीत या ठिकाणाचा समावेश नव्हता. आदल्या दिवशी संध्याकाळी आम्ही आमचा ऑस्ट्रियामधील मित्र गोर्ग पेस्टल यांच्याशी सहज चर्चा करीत होतो. तेव्हा त्याने आम्हांला सांगितले की शहरात एक सुंदर असे जहाजांचे संग्रहालय आहे आणि ते पाहण्यासरखे आहे. त्याची आम्हांला असेही संगितले की चिनी मंडळी मूळची दर्यावर्दी आहेत. जुन्या काळात त्यांनी समुद्रात दूरवर प्रवास केला. त्यासाठी आवश्यक ते सर्व तंत्रज्ञान त्यांनी अवगत केले होते. या सर्व बाबींची माहिती या संग्रहालयात मिळते असे त्याने आम्हांला सांगितले. त्याच दिवशी दुपारी तो तिथे जाऊनदेखील आला होता. त्यामुळे त्याचा अनुभव ताजा होता. त्याने आम्हांला संग्रहालयाची माहिती देणारे पत्रकदेखील दिले. त्याच्या सल्ल्यावरून जहाज संग्रहालयाला भेट देण्याचे आम्ही ठरविले.

आमच्या राहण्याच्या ठिकाणापासून हे संग्रहालय खूपच जवळ होते. टॅक्सीने आम्हांला तिथे पोहोचायला जेमतेम पंधरा मिनिटे लागली असतील. संग्रहालय यांगत्सी नदीच्या किनाऱ्यावर उभारलेले असून त्याचा परिसर खूप मोठा आहे. टॅक्सीतून उतरताच एका सुंदर प्रवेशद्वाराकडे आमचे लक्ष गेले. त्याच्याजवळच तिकिटघर होते. प्रवेशाचे तिकीट घेऊन आम्ही आत गेलो. प्रवेशद्वारावरच संग्रहालयाची माहिती देणारे मोठे चित्र आहे. त्यावरून कोणत्या ठिकाणी काय आहे याची आपल्याला माहिती मिळते. त्याचबरोबर, जागोजागी दिशा दाखविणारे बाणदेखील आहेत. त्यांनुसार आम्ही मार्गक्रमण करीत होतो. सर्वप्रथम आम्ही पाहिली ती एक महकाय घंटा. ती घंटा मिश्रधातूंची बनवलेली होती.



**संग्रहालयाची माहिती देणारे पत्रक**



**ब्राँझ धातूची महाकाय घंटा**

घंटेचे दर्शन घेऊन आम्ही पुढे चालू लागलो. तेथून अनेक वाटा फुटतात. कोणत्या वाटेवर काय आहे याची माहिती दिलेली होती. ती आम्ही वाचू लागलो. तेव्हढ्यात आमची पुढे नजर गेली तर आम्हांला एक भव्य असे जहाज दिसले. म्हणून आम्ही चालत चालत जहाजाजवळ पोहोचलो. तेथे गेल्यावर कळले की आम्हांला पुढे दिसणारे जहाज ही झेंग हे या चिनी दर्यावर्दी व्यक्तीने ६०० वर्षांपूर्वी वापरलेल्या जहाजाची प्रतिकृती होती.



**झेंग हेच्या जहाजाची प्रतिकृती**

जहाजाच्या आत जाऊन आपण आतील व्यवस्था पाहू शकतो. त्याचबरोबर, वरच्या डेकवर जाऊन तेथे ठेवलेल्या वस्तूदेखील पाहू शकतो. आम्ही ही संधी घेण्याचे ठरविले. त्यानुसार आम्ही जहाजात प्रवेश केला. तेथे जुन्या जहाजाच्या छोटेखनी प्रतिकृतींचे प्रदर्शन भरविलेले होते. प्रत्येक प्रतिकृती आतिशय काळजीपूर्वक बनविण्यात आली होती. त्यामुळे त्या खूपच सुंदर दिसत होत्या. त्याचबरोबर त्या सर्व प्रतिकृती अतिशय पद्धतशीरपणे लावून ठेवलेल्या आहेत. प्रत्येक प्रतिकृतीवर पुरेसा उजेड पडेल अशी व्यवस्था केलेली होती.

जहाजाच्या प्रतिकृतींचे प्रदर्शन पाहून झल्यावर आम्ही जिन्याने वरच्या डेकवर गेलो. वरच्या डेकवरून आजूबजूचा परिसर पाहता येतो. ज्या वेळेस येथे जहाजबांधणीचे काम चालत होते तेव्हा आजूबाजूचा परिसर मोकळा होता. आता मात्र शहर खूप वाढले आहे.





**जहाजाच्या प्रतिकृतींचे प्रदर्शन**

शहराच्या विकासाबरोबर गगनचुंबी इमारती उभ्या राहिल्या. त्या उंच इमारतींचे मनोहारी दर्शन या ठिकाणावरून होते. याहीपेक्षा महत्त्वाचे हे की डेकवर जुन्या काळातील तोफा अतिशय पद्धतशीरपणे रचून ठेवलेल्या आहेत.



**डेकवर ठेवलेल्या तोफा**

संग्रहालयात सुंदर बाग निर्माण केलेली आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पती पद्धतशीर लावलेल्या असल्यामुळे संपूर्ण परिसर सुंदर दिसतो. समुद्रात सापडणारे शंख आणि शिंपले यांचा उपयोग करून सुंदर कलाकृती केलेल्या आहेत. पायी चालण्यासाठी केलेल्या पायवाटेतदेखील कलाकुसर आढळते. काही पायवाटा रेतीने, काही गुळगुळीत दगडांनी तर काही शिंपल्यांनी बनवलेल्या आहेत. या रस्त्यावरून पायी जाताना एक वेगळाच आनंद मिळतो.





**संग्रहालयाची सुंदर बाग**

१४ व्या शतकात जनजीवन कसे होते याची माहिती देण्याचादेखील येथे प्रयत्न केलेला आहे. जागोजागी पुतळे उभारून जुन्या काळातील दृश्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे पुतळे इतके जिवंत आहेत की आपण प्रत्यक्ष व्यक्तीच पाहत आहोत असा आपल्याला भास होतो.





**संग्रहालयातील बोलकी दृश्ये**

चालत चालत आपण जेव्हा बागेच्या टोकाला पोहोचतो तेव्हा आपल्याला एक लहानसा जलाशय दिसतो. तो पार करून दुसऱ्या बाजूला जावे लागते. त्यासाठी लाकडी पायवाट बनवलेली आहे. त्यावरून आम्ही जेव्हा पुढे गेलो तेव्हा एक मंदिर आमच्या नजरेस पडले. तेथे बुद्धाची मूर्ती आहे. मंदिराच्या बाहेर येऊन डावीकडे नजर टाकली की एक महाकाय पुतळा आपल्या नजरेस पडतो. हा पुतळा झेंग हे नावाच्या माणसाचा असून १५ व्या शतकाच्या सुरुवातीला तो आफ्रिका खंडापर्यंत जाऊन आला होता. एक धाडसी समुद्रप्रवासी म्हणून त्याची ख्याती आहे. त्याच्या पुतळ्याजवळ त्याच्या कार्याची सगळी माहिती दिलेली आहे.



**झेंग हे याचा ब्राँझचा पुतळा**

पुतळ्याचे दर्शन घेऊन आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो. येताना आम्ही वेगळा रस्ता निवडला. त्या वाटेवरून येताना आमच्या नजरेस पडले ते जहाजांचे नांगर. त्याचबरोबर जहाजात वापरावयाच्या अनेक वस्तू बागेत पद्धतशीरपणे ठेवलेल्या आहेत.





**उत्खननात सापडलेल्या वस्तू**

झेंग हे या नावाची चिनी व्यक्ती दर्यावर्दी होती. पंधराव्या शतकात त्याने अनेक वेळा समुद्रप्रवास केला. समुद्र प्रवासासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि उपकरणे त्याच्याजवळ होती. त्या काळातील चीनचे राजे मिंग यांनी झेंग हे याला समुद्रप्रवासासाठी आर्थिक मदत दिली होती. नॅनजिंग या शहरातच जहाज बांधण्याचा कारखाना होता. या कारखान्याची जागा यांगत्सी नदीच्या किनायावरच होती. मिंग राजा जिवंत होता तोपर्यंत समुद्रप्रवासाला आणि जहाजबांधणीला प्रोत्साहन मिळत राहिले. पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात मिंग राजाचा मृत्यू झाला. त्यानंतर जहाजउद्योगाला मरगळ आली. त्याचबरोबर समुद्रप्रवासालादेखील मदत मिळणे बंद झाले. त्यामुळे चीन या क्षेत्रात मागे पडला.

२००५ मध्ये झेंग हेच्या जन्माला ६०० वर्षे पूर्ण झाली. त्याचे औचित्य साधून झेंग हे स्मृती समिती स्थापण्यात आली. या समितीने त्याच्या नावाने संग्रहालय स्थापन करण्याची योजना आखली. या योजनेला सरकारने हिरवा झेंडा दाखविला. त्यानुसार जेथे जहाजबांधणीचे काम चालायचे तेथेच संग्रहालय उभारण्याचे ठरले. सुरुवातीला त्या ठिकाणी उत्खनन करून बऱ्याच वस्तू शोधून काढण्यात आल्या. त्याचबरोबर झेंग हेच्या समुद्रप्रवासाबद्दल माहिती गोळा करण्यात आली. स्मृती समिती आणि सरकारी यंत्रणा यांच्या सहकार्याने हे संग्रहालय उभे राहू शकले. आजच्या घडीला ते नॅनजिंग शहरात दिमाखात उभे आहे. स्वयंसेवी संघटना आणि सरकारी यंत्रणा एकत्र आली तर काय होऊ शकते याचे हे संग्रहालय म्हणजे एक मूर्तिमंत उदाहरण आहे.

**सुधाकर आगरकर**
विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

●●●

# नर्मदा परिक्रमा

भाग : ६

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत – संपादक*

**दिवस २२ वा – रायसिंग (उमछाच्या अलीकडे ३ कि.मी.) ते वाघपुरा (झगडियाच्या अलीकडे २ कि.मी)**

काल रात्री शेकोटीसाठी बाहेर जाऊन लाकडे आणली होती, परंतु विस्तव रात्रभर राहिला नाही. लाकडे जाड, नीट पेटली नव्हती. आम्ही जवळपास शेतातच होतो. आजूबाजूला वन्य प्राणी वावरत असतील तर अग्नी पाहून जवळ येत नाहीत हे ठाऊक असल्याने शेकोटीचा उपद्व्याप केला होता.

सकाळी ५ ऐवजी ५.५८ ला जाग आली, उठलो तोपर्यंत किशोरभाई चहा घेऊन आलेसुद्धा. सफरचंदे, संत्री, चिकू ही फळफळावळ, चिकी, बेसनवड्या हे सारे त्यांनी बरोबरच आणले होते. रात्री त्यांनी मेणबत्त्या दिल्या होत्या. आज धूपकांड्याही दिल्या. गंमत म्हणजे तूपवाती परवा संपल्या आणि काल त्यांनी दोन वाती आरतीसाठी दिल्या. सर्व आवरून निघायला ७।। वाजले. तोपर्यंत किशोरभाई पण्ड्या आमच्याबरोबरच होते. उमछा गावाजवळ चहा घेऊन पुढे निघालो आणि मागून किशोरभाईंनी आम्हांला गाठले. त्यांनी केलेल्या साह्याबद्दल कृतज्ञता म्हणून निघताना काही रक्कम त्यांच्या परस्पर श्री. देवधरांच्या खणात (ड्रॉवर) ठेवली होती. ती रक्कम त्यांना दिसल्यावर ते त्याच पावली आमच्यामागे आले व पैसे परत केले. काल त्यांनी आम्हांला त्यांचा फोटोसुद्धा घेऊ दिला नव्हता आणि आठवण म्हणून रंगावधूत /दत्तपादुका यांचे फोटो पॅम्पलेट मात्र आम्हांला दिले.

जेवायला फळफळावळ असल्याने चिंता नव्हती. वाटेत एक कृष्णमंदिर दिसले. आम्ही दर्शन घेतले. आम्ही दर्शनासाठी गेलो नव्हतो, तर बुटांमध्ये शिरलेली वाळू त्रास देत होती ती काढण्यासाठी निमित्त हवे होते. महाराज नव्हते म्हणून त्यांची बायको देवांना हार फुले घालत होती. मी 'नर्मदे हर' म्हणून मूर्ती फार छान आहे असे सांगून मंदिरातून खाली उतरलो. पायऱ्यांवर बसून बूट घातले.



मंगल म्हणाली, 'तुम्ही बोलण्याचा प्रयत्न केलात, पण पुजारीणबाईंनी लक्षही दिले नाही. दखलच घेतली नाही, मंदिरासमोरच बाकडी होती. त्यावर आमच्या सॅक होत्या. पुजारीणबाईंचे घर बाकड्यांच्या बाजूलाच होते. आम्ही सॅक पाठीला मारल्या आणि निघालो, तोच ओट्यावरून पुजारीणबाईंचा पुकारा आला, 'महाराज, चाय लीजिए!'

आमच्या मनातले किल्मिष, पूर्वग्रह, लपविलेल्या कामना सर्व सर्व त्या नर्मदामैय्याला कळते; याची वारंवार प्रचिती येते.

पुजारीणबाईंचे आम्ही केलेले मूल्यांकन पूर्ण चुकीचे होते. फुले हार वाहताना त्या मनात श्लोक म्हणत असतील त्यामुळे त्यांनी मला प्रतिसाद दिला नसावा. मंदिरातून

खाली उतरून, त्यांनी घरात मस्त चहा ठेवला असावा, कारण आम्ही तयार होऊन निघालो तर चहा ओट्यावर आलासुद्धा होता.

नर्मदे माते, क्षमस्व! आमचे मूल्यांकन सापेक्ष, स्वार्थासहित असते. काल शेकोटीसाठी जी लाकडे मी आणली तीसुद्धा एका टपरीखाडून उचलून आणली. खरे म्हणजे ही स्वार्थापोटी केलेली चोरीच होती.

क्षमस्व! माते नर्मदे! क्षमस्व! इतकेच नव्हे तर परिक्रमेच्या पवित्र पर्वातही मला वासना त्रास देतात. कारण त्या मीच अंतरी पोसलेल्या आहेत. झोपेत याची परिणती स्वप्नदोषात झाली.

क्षमस्व! माते, माझ्या मनातले विकार दूर राखण्यासाठी मला मदत कर. माझा प्रयत्न प्रामाणिक होऊ दे.

आजची वाटचाल फार तापदायक ठरली कारण रस्तारुंदीकरणासाठी सरकारने पूर्वीची सर्व झाडे नष्ट केली आहेत. हा हायवे पूर्वीपासून असल्याने आजपर्यंत आम्ही छान सावलीतून प्रवास केला. ब्रिटिशांनी लावलेल्या या झाडांचे मी मनापासून कृतज्ञतापूर्वक कौतुक करत होतो.

देढियपाडपुढील रस्ता, घाटातून नव्याने काढलेला असल्याने झाडी नाही हे ठीक आहे, पण पूर्वीपासून असलेला हा रस्ता बोडका करून सरकारने कुठला विकास साधला?

काल आणि आजही भाजीवालीकडे आम्हांला ताक मिळाले. दुपारी २।।/३ ला एका गावात हॅण्डपम्प पाहून स्नान केले. जवळच्या घराच्या (झोपडीच्या) ओट्यावर सॅक ठेवल्या. कपड्याचा व अंगाचा साबण आज घेतला. पैकी अंगाचा नाही, पण कपड्याचा साबण वापरला. गंमत म्हणजे कोमल नावाची आठ-एक वर्षांची मुलगी हातपंपावर मला पाणी काढून द्यायला आणि कपडे धुवायला मदत - मदत कसली - तिनेच कपडे आघळले.



त्या घरात स्नानानंतर ओट्यावर छान चहा (दुग्धविरहित) झाला.

स्नानानंतर उन्हात चालणे जड झाले होते. मोठे गाव २ किमी वर असताना, वाघपुरा हे गाव लागले. तिथे देऊळ पाहून आलो होतो, पण ते छोटे दिसल्याने समोर असणाऱ्या मातीच्या घराच्या पडवीत विनंतिपूर्वक मुक्काम ठोकला. 'करसनभाई पटेल' या ड्रायव्हरचे हे साधे घर. घरातली माणसे खूप छान.

'भटाला दिली ओसरी' या म्हणीनुसार हळूहळू चहा नंतर रोटी-भाजी, नंतर डायरी लिहिण्यासाठी त्यांच्याच बाहेरच्या खोलीत, तिथेच फोम बॅटरी चार्जिंग' असे पाय पसरलेही.

मुक्काम मात्र दिवा नसलेल्या पडवीत आणि प्रार्थना, पूजा, भोजन हेसुद्धा तिथेच - 'नर्मदे हर'!

**दिवस २३ वा : वाघपुरा - अंकलेश्वर २४ कि.मी. मुक्काम - देव सर्व्हिस सेंटर - लालाभाई**

सकाळी ६। वाजता नित्याप्रमाणे निघालो. वाटेत रस्त्यावर पण कडेला कारमध्ये टांगातत तसा पक्षी एका पॅकिंगच्या ४ मि.मी. नायलॉन पट्टीला बांधलेला आढळला. पट्टी चांगली फूटभर लांब होती. पक्षी खरा होता की खोटा काही कळेना. काठीने स्पर्श केला, काही नाही. शंका अशी आली की कारमध्ये टांगतात त्या पक्ष्याला काळी बारीक दोरी असते. इतकी रुंद नॉयलॉन पट्टी नसते.

दानाइतकंच त्यागालाही महत्त्व असतं.

काठीने हळू पुन्हा प्रयत्न केला तेव्हा हालचाल झाली. मग कळले पक्षी खरा आहे. ही लांब पट्टी अडकळल्याने तो उडू शकत नव्हता. मुळात ते तितर/बटेरा अशा जातीचे पिलू होते.

अडकलेली पट्टी काढून त्याला मोकळे करावे म्हणून पाहिले तर दोन्ही पंखांतून ही नायलॉन पट्टी बांधून एक नाही, तर दोन गाठी मारलेल्या होत्या. बिचाऱ्याचा एक पंख रक्ताळलेला नंतर दिसला.

पक्ष्याला हातात घेऊन हळुवारपणे खाली सोडून पट्टी काढून टाकली. आता फोटो काढू म्हणेतो तो हातावरून खाली झेपावला व रस्त्याकडेच्या गवतात गुप्त झाला.

कुणीतरी मुलाने हा क्रूर खट्याळपणा केला असावा. हमरस्ता, वाहनांची वर्दळ यांमध्ये हा पक्षी गाडीखाली सापडला असता, कुणी प्राण्याने खाल्ला असता किंवा उडता येत नाही, फूटभर पट्टी घेऊन फिरता येत नाही म्हणून उपाशी, आजारी असा मेला असता.

मैय्यानेच त्याला वाचविले, फक्त आमच्याद्वारे! दलपतराम - एक वल्ली व्यक्तिमत्त्व, रजनीश-ओशोप्रमाणे पांढरी लुंगी, स्वच्छ पांढरा झब्बा, फाटलेला पण स्वच्छ पांढराशुभ्र लांब, शोभणारी दाढी, धारदार नाक, उंच रुंद कपाळ आणि तेजस्वी चेहरा.

घरी बायको गेली दोन वर्षे अंथरुणावर आहे. दलपतरामचे मंदिर आहे. सकाळी उठून पूजापाठ, पत्नी सेवा इत्यादी करून नाक्यावर येतो. त्याची चहाची गाडी आहे. परिक्रमावासीयांना बोलावून चहा पाजण्यात धन्यता मानणारा. मंदिरात वार्षिक भंडारा होतो; परंतु कुणापुढेही हात पसरत नाही.

अशा दलपतरामने आम्हांलाही थांबवून चहा दिला. गप्पागोष्टी झाल्यावर निघणार तेवढ्यात त्याने तीने माणसांत चार काठ्या पाहिल्या. राजपिपलाच्या अलीकडे मला एक काठी भेट मिळाली ती व माझी हिमालयन ट्रेकची काठी, पण खालून उभी तडकत चाललेली! गेले दोन दिवस मी दोन काठ्या वागवताना विचार करता होतो की मैय्याचा काय संकेत असावा?

पहिल्या काठीचे काय करावे हा प्रश्न दलपतरामने सोडविला. हिमालयातली यादगार आणि आता २२ दिवस साथ दिलेली परिक्रमा काठी त्याने मागून घेतली व ती आता त्याच्या मंदिरात कायमची राहील, याची ग्वाही दिली.

दुपारी उन्हाचा त्रास झाला. झाडे कापल्याचा परिणाम. वाटेत स्नानाचा विचार होता. शेडमध्ये एक-दोन घोड्यांची तोंडे कुंपणावर दिसली आणि वाटले, हा स्टडफार्म असावा, इथे स्नानाची व्यवस्था होईल.

द्वारापर्यंत आलो तेव्हा कळले, ती हरि ॐ नावाची गोशाळा होती ! हरि ॐ/श्रीकृष्णः शरणं मम ची धून वाजत होती. गेटमधून आत शिरलो. नोकराने सांगितले थंड पाणी प्या, इथे आंघोळ वगैरे काही नाही. मी म्हटले इतक्या गाई आहेत, घोडे आहेत, तुम्ही आहात, काही पाण्याची व्यवस्था असेलच ना!

इतक्यात, कुत्र्यांच्या थुंकण्याचा थयथयाट ऐकला. पाहिले ते एका मोठ्या पिंजऱ्यात एक भला मोठा कुत्रा. शिवाय दोन-तीन तुलनेने लहान कुत्रे आणि एक कुत्रा पिंजऱ्याबाहेर साखळीने बांधलेला.



हे स्वागत पाहून निघून जायचा विचार केला. तेवढ्यात एक तरुण कामकरी मुलगी आली. आम्ही कार्यालयासमोर उभे होतो. ते बंद होते. ती मुलगी म्हणाली

'विचारल्याशिवाय होणार नाही'. विचारणार कोणाला? तिने मागे अंगुलिनिर्देश केला. ऑफिसामागून गेलो तर एक प्रशस्त बंगला होता. ते कुत्रे त्याच कुंपणात होते आणि काही हंस कलकल करीत पाण्याकडे चालले होते.



एक सौम्यशी व्यक्ती झोपाळ्यावर बाहेर बसली होती. मला पाहून ती यायला निघाली आणि फोन आला म्हणून बोलत उभी राहिली.

फोन संपेपर्यंत त्याचे माझ्याकडे पाहिले नाही. मी भिकाऱ्यासारखा हात जोडून गेटमध्ये उभा होतो; परंतु लवकरच त्यांनी बोलणे संपवून माझे म्हणणे ऐकले व आम्हांला स्नानाची मुभा दिली अगदी आवारातील मोठ्या स्नानगृहात.

त्या व्यक्तीचे नाव बाबूभाई, सुरतचे. अधेमधे इथे येतात. नोकर फार उर्मट आणि एरव्ही ते भयंकर कुत्रे गेटवर असतात त्यामुळे आत कुणी जात नाही असे नंतर पुढे चहाच्या टपरीवर समजले.

दरम्यान एका ठिकाणी थांबवून चहा दिला. ती स्वाध्यायी स्त्री आहे, हे बोलण्यावरून कळले. दुसऱ्या ठिकाणी गरम भजी व ताक मिळाले.

**निरीक्षण** : अंकलेश्वरजवळ आल्याच्या खुणा अस्वाव्यस्त गलिच्छ वस्ती, उकिरडे, घाण पाणी, अगदी उल्हासनगरला लाजवेल अशी घाण.

रस्त्याच्या कडेला हारीने भंगार लाकडाची दुकाने. अंकलेश्वर अगदी घाणेरडे शहर आहे, याची प्रचिती आली.

अंकलेश्वरकडे येताना एखाद-दोन कि.मी. भाग सोडला तर झाडे अजिबात नाहीत. सकाळपासून अखंड वर्दळ आणि सतत जपून चालावे लागते. रेतीचे प्रमाण मात्र आता वाढले आहे.

अंकलेश्वरला पोहोचण्यापूर्वी एक संपर्क केला होता. सुलतानपूरच्या सुरेन्द्रभाईचा साडू! मेहुणा! दुपारी पुन्हा फोन केला, लागला नाही.

गावात शिरल्यावर फोन केला, लागला. कळले की संजयभाईचे हे संपर्क घर या रस्त्यावर नसून, मागे जाऊन ३/३ ।। कि.मी आडवे गेल्यावर गोपाळ नगर येथे आहे. आम्ही रामकुंडाकडे ENROUTE जायचा निर्णय घेतला व येत नसल्याबद्दल क्षमा मागितली.

संजयभाईंकडून थोड्या वेळाने फोन आला की गाडीने घरी आणण्याची व्यवस्था करत आहोत. आम्ही नम्र नकार देऊन पायी चालण्याचे व्रत सांगितले व पुढे रामकुंडाकडे निघालो.

रामकुंडाकडे निघालेले बरेच परिक्रमावासी पाहिले, विचार केला इतरत्र कुठे सोय पाहावी. ५।। वाजून गेले होते. वाटेत एक छान हिरवळीचे बंदिस्त विश्रामस्थान (बाग, लॉन) पाहून जरा विसावलो.

दोन मुले उत्सुकतेने माझ्याकडे पाहत होती. निघताना मी त्यांच्याजवळ मंदिराची चौकशी केली. जवळच एक टुमदार शिवमंदिर होते. आत जाऊन पुजारीणबाईंना विनंती केली तर म्हणाल्या, आदर्श सोसायटीचे हे मंदिर आहे, परवानगी विचारते तोपर्यंत तुम्ही बाहेरच्या बाकावर बसा.

अशोक व सौ. मंगल मंदिर आवाराबाहेरील बाकड्यावर आधीपासून बसले होते. त्यात मीही जाऊन बसलो. आशा आता धूसर होती. सोसायटी, सेक्रेटरी, कमिटी...

इतक्यात एक उघडी जीप, हतारी सिनेमात होती तशी, त्यातून एक टीशर्ट-जीन्स घतलेला तरुण उतरला. त्याने थांबून आम्हांला पाणी विचारले, भोजनाची व्यवस्था विचारली. तेव्हा आम्ही इथे बसण्याचे प्रयोजन सांगितले. 'पुढे माझी खोली आहे. त्यात पाणी, पंखा सर्व आहे' हवे तर मी ती तुम्हांला देतो' असे तो म्हणाला आणि बाजूच्या सोसायटी वास्तूत गेला.

आमही विचार केला. सोसायटीचा होकार मिळणे नाही तेव्हा देवाने केलेली ही सोय स्वीकारावी! बराच वेळ तो परतला नाही तेव्हा मी पुढे हाऊन त्याला गाठले व पत्ता विचारला.

'असेच पुढे जा, देव सर्व्हिस सेंटर माझे आहे. मी पाठोपाठ येतोच' म्हणाला.

आम्ही पुढे येऊन सर्व्हिस सेंटरच्या आवारात आलो व सॅक उतरविल्या. तीन-चार जण खुर्च्यांवर, बाइकवर, रिक्षामध्ये बसून गप्पा मारत होते.

आम्हांला थोडे कानकोंडे झाले, तेवढ्यात एकाने वीस रुपये काढून देऊ केले, दुसऱ्या कडून मी एक रुपाया घेतला. त्यांनी आत्मीयतेने चौकशी केली. हॉटेलमधून भोजन मागविण्यासाठी पैसे काढले, तेव्हा 'आम्हीच तिथे जाऊन जेवू' म्हटल्यावर नोटा आमच्या हातात कोंबल्या. 'आजचे भोजन आमच्याकडून', धीरजभाई म्हणाले.

पाहिले तर ११० रु. होते. पैसे फार आहेत म्हटले तर म्हणाले, उरले तर उद्याही वापरा. आम्ही हे पैसे सत्कार्यात देऊ म्हणून सांगितले तर म्हणाले, 'हे पैसे तुम्हांला खाण्यासाठी दिले आहेत ते त्यासाठीच वापरा.'

तोपर्यंत मालक - लालाभाई - मागोमाग आलेच. हाच तो तरुण होता जीपमधून उतरलेला.

मैय्या पूजनापूर्वी आम्ही त्या सर्व्हिस स्टेशनच्या आतल्या खोलीत सॅक ठेवल्या. कोणीतरी चहा विचारला होता, पण आला नव्हता. आम्ही पूजा केली तोच दीपेश नावाचा मघाशी बसलेला तरुण घरून चहा आणि फरसाण घेऊन आला. भोजनाचे विचारू लागला तेव्हा हॉटेलमधील भोजन तिखटविरहित असू शकणार नाही. त्यापेक्षा घरून येऊ शकणारी खिचडी सांगून तशी येईल म्हणून भाजी व खिचडी सांगितली.

पूजन आटोपून अशोकबरोबर मी रामकुंड आश्रमात गेलो. शिक्का घेण्यासाठी. निघाल्यापासून पाऊण-एक तासाने हे ठिकाण आले. शिक्का मिळत नाही हे कळले. धर्मशाळा भरलेली होती. दिवे नव्हते, सगळी अव्यवस्था दिसली. आम्ही इथे न येण्याचा घेतलेला निर्णय योग्यच ठरला.

परत आलो. भरपूर खिचडी, वांगे-बटाटा रस्सा, दही, फ्रूट सॅलड असा भरगच्च डबा आला होता. लालाभाईने एका मुलाला आमच्या दिमतीसाठी थांबवून ठेवले होते.

आम्ही रामकुंडाकडे गेलो असताना जवळपास राहणारा मुलगा मंगलशी बोलला. लालाभाई तिथला भाई म्हणजे किंग आहे असे त्याने सांगितले.

आम्हांलाही मघाशी लालाभाई तसेच त्याच्या सर्व साथीदारांनी सांगितले होते की, पुढे कुठेही काहीही समस्या आली तर लालाभाईची ओळख सांगा. त्याने स्वतःचा फोन नंबरही दिला व कठपोर संपर्कही दिला.

सर्व्हिस स्टेशन आवारात एक प्रेमळ कुत्री मोकळी तर इतर दोन रागीट कुत्रे साखळीबद्ध होते. रोज सकाळ संध्याकाळ लालाभाई त्या कुत्र्यांच्या खाण्यावर ३००/३०० रुपये खर्च करतो असे दिमतीला ठेवलेल्या मुलाने सांगितले.

डास प्रचंड प्रमाणात होते, परंतु पंखा होता. शहरात असल्याने की काय, पण थंडी नव्हे तर उकाडाच होता. रात्री अकरानंतर सुरक्षारक्षक आला व तिथेच झोपला. मी डायरी लिहीत ११ ।।। पर्यंत जागा होतो.

क्रमशः

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

आपण कोणासारखे दिसतो, यापेक्षा कोणासारखे वागतो हे अधिक महत्त्वाचं असतं.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. साने यांच्या विचारपरिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

## नैतिकता, धार्मिकता व आध्यात्मिकता (Morality, Religiocity and Spirituality)

### प्रास्ताविक

**नैतिकता, धार्मिकता व आध्यात्मिकता** ह्या तीन संकल्पना मुळात 'मानवी' जीवनात आहेत. ह्या विश्वात ह्या पृथ्वीवर जे मानवी जीवन अनेक युगे अस्तित्वात आहे, त्या मानवी जीवनातील वैयक्तिक, सामाजिक व नैसर्गिक जीवनाच्या प्रगतिपथावर 'ह्या' संकल्पनांचा उदय झाला व **त्याला अनेक अर्थाने ऐतिहासिकता आणि मानवी समाजनिर्मित 'जीवन मूल्यांचे संदर्भ' प्राप्त झाले.**

### प्रचलित चौकटीचा संदर्भ

एखादा फिल्म डायरेक्टर त्याच्या हाताच्या ज्यांच्या चौकटीत एखाद्या दृश्याचा संदर्भ 'कॅमेऱ्याच्या चौकटीत' जसा बघण्याचा प्रयत्न करतो तसाच काहीसा प्रकार ह्या संकल्पना बघण्याचा, अनुभवण्याचा प्रयत्न ह्या पृथ्वीतलावावर चालू आहे!!

### प्रचलित सामाजिक नैतिकता व व्यवस्था

विशेषतः नैतिकता ही संकल्पना तर सामाजिक व वैयक्तिक मानवी जीवनाच्या त्या त्या काळातील आदर्श आचारविचार, धर्मसंकल्पनेतील आदर्शवादी मूल्ये, ह्यांवरील प्रचलित संदर्भावर आधारून असते. उलट, धर्म (Religion) ही संकल्पना मानवी **तर 'आत्मधर्म'** ही **'वैश्विक सत्य'** होय. 'Spirituality' पेक्षा आध्यात्मिक ही 'पूर्णपणे' **'वैश्विक सत्य' (Cosmic Reality)** होय. कारण ती जीवात्मा व शरीर या युतीने केलेला 'आत्मा' (अज=ज्याला जन्म नाही पुरुषसूक्त) ह्या चीजेचा अभ्यास होय!

### ह्या शतकातील Fake Encounter संकल्पना

आपण सध्याच्या **'Fake Encounter'** (बनावट द्वंद्व) ह्या वादग्रस्त विषयावर ती तपासून बघू या!! ईश्वराने जरी निसर्गतः ''जन्म व मृत्यू'' ह्या दोन्ही गोष्टींना, त्यांच्या दृश्य न्याय नियमांचा आधार व निर्णय दिला असला, तरी **सध्याच्या मानवी समाजाने तो आपल्या** नैतिकतेच्या **'अज्ञानी समजावर'** आधारून आपल्या हातात **'जन्म व मृत्यू'** ह्या गोष्टींवर, **ईश्वराबरोबरच, स्वतःला अंशतः जन्मांवर मृत्युदंडाचा, अधिकार मिळवला आहे!!** सध्या ह्या दोन्ही संकल्पना **प्रायोगिक अवस्थेत 'मानवी ज्ञानात'** वावरत आहेत!! **गोंधळात आहेत!!**

त्यामुळे पोलीस, मिलिटरी व न्यायसंस्थेच्या नियमावली ह्या 'चौकटीत' व गुन्हेगारांना, वा या 'नियमावलीचा भंग करणाऱ्या जिवांना, 'मृत्युदंड' देण्याचा अधिकार एका अस्थिर व प्रायोगिक विचारात बांधून टाकला आहे!!

### द्वंद्व



सोळाव्या, सतराव्या शतकात किंवा अगोदरही जर दोन व्यक्तींमध्ये तंटा झाला तर तो द्वंद्व करून त्यातील प्रचलित मान्य नियमांच्या आधारावर निकालात काढण्याची एक द्वंद्व 'नीतिसंकल्पना' रूढ करून टाकली होती. त्यामुळे, दुसऱ्या मानवाला गुन्हेगार ठरवून मृत्युदंड देण्याचा अधिकार हा त्या द्वंद्वयुद्धाच्या 'नैतिक चौकटीत' बंदिस्त करून टाकला होता. त्या नीतिसंकल्पनेचा नवीन उपयोग आज राजसत्ता व पोलीस करू लागले आहेत!!

## जुनीच संकल्पना

ह्याचाच आधार **'Encounter'** एनकाउंटर ह्या नूतन पोलिसी यंत्रणेचा होय. त्याला समाजाची, राज्यसंस्थेची व न्यायसंस्थेची अलिखित मान्यता आहे. त्यामुळे आता त्यामध्ये सुद्धा 'Fake' म्हणजे बनावट, फसवी खोटेपणा हा काय प्रकार आहे ते गुजरात, 'बाटला प्रकरण' सुऱ्हाबुद्दीन व महाराष्ट्रात 'प्रदीप शर्मा' व 'साळसकर' या प्रकाणांत समजते. ज्याला एनकाउंटर करून गोळी घालण्यात येते, त्या शिक्षेला पात्र असणारी व्यक्ती, राज्यसंस्थेच्या दृष्टीने 'गुन्हेगार' असते. तरी देखील, न्यायसंस्थेच्या चक्रव्यूहातून हा मृत्युदंड देण्याची परवानगी न मिळवता, हा अधिकार 'ह्या एन्काउंटर' ह्या सिस्टिमधल्या न्यायनीतीप्रमाणे परवानगी घेऊन वरीष्ठांचा हुकूम मिळवून, दंड दिला जातो. त्यावरील शंका घेतल्यास एनकाउंटर म्हणून झालेल्या प्रकाराला 'Fake Encounter' म्हणण्यात येते.

## राजकीय खेळ

पण उघडपणे 'राजसत्तेच्या राजकारणात' सुद्धा आणखी 'शुद्ध' अशा नैतिकतेच्या दुर्बिणीतून शंका घेऊन खुद्द पोलीस यंत्रणेतील अधिकाऱ्यांवर आरोप करून त्यांनाच तुरुंगवास भोगावयाला लागतो, असा प्रकार, 'गुजरात न्याय नैतिकतेतील' व 'दिल्ली राजसत्तेकडून हस्तक्षेप होऊन', पुन्हा पुन्हा, सुप्रीम कोर्टाच्या नीतिमत्तेच्या पायरीवर मृत्युदंडाच्या योग्यतेवर घोळ घालण्यात जाऊ शकतो. **हा गोंधळ खुद्द संकल्पनेचा की राजकीय हेतूंच्या खेळाचा?**

सामान्य माणसाच्या तर्कबुद्धीला हा गोंधळ उमजू शकत नाही, पण भौतिक नैतिकतेच्या 'समाजमान्य' नीतिनियमांत ह्या मानवी नीतिसंकल्पनेला मान्यता ही 'Fake Encounter' ह्या अत्यंत 'नवीन न्यायनीति तत्त्वाने' लडबडलेल्या प्रमाणांवर उलटसुलट निर्णय होऊ शकतात!! हे आपण पाहत आहोत!!

अत्यंत गोंधळाच्या या नवीन सामाजिक न्यायनीती तत्त्वाचा मानवी मापदंड कुणालाही विचार करण्यास भाग पाडू शकतो. पण तसा तो 'बुद्धिवादाने' व प्रचलित समाजमनाने मान्यता मिळवून गळा घोटून मिळवलासुद्धा जाऊ शकतो!!

## मृत्युदंडाचा अधिकार कोणाला?

**मुळातच, एखाद्या मानवाला मृत्युदंड देण्याचा हा हक्क एक तर निसर्गाला वा ईश्वराला असताना, तो समाजाने जगाच्या इतिहासात राजसत्तेच्या यंत्रणेला (व न्यायसंस्थेला) बहाल केला आहे.** ह्या ''सामाजिक अधिकाराला'' समाजमान्यता कधी व कशी मिळाली, ह्या इतिहासात आपण शिरत नाही आहोत!! तो इतिहास असे दाखवितो की **बळी तो कान पिळी ह्या Animal behaviour 'हिंस्त्रप्राणी वर्तणूक न्यायावर' आधारलेल्या नैतिकतेपासून उत्क्रांत होत होत व राज्यसंस्थेच्या लोक पंचायत, राजे महाराजांच्या अधिकारातून पुढे प्रगत होत होत आता समाजमान्य न्यायशास्त्र, कायदा वगैरेच्या चौकटीत, हा अधिकार न्यायधीशांना देण्यात आला.** पण तो अत्यंत दुर्धर व सराईत गुन्हेगारांना उपलब्ध असणाऱ्या न्यायसंस्थेच्या कोर्टाच्या यंत्रणेत (पळवाटा असल्याने) हा अधिकार आजकाल पोलिसांना देण्यात आला. हा आहे गोंधळाच्या

नीतिमत्तेचा शेवटचा शोध. अजूनही त्याला निर्णायक स्थैर्य नाही. हे अस्थैर्य नीतितत्त्वावर नव्हे तर राजकीय सत्तेच्या हितसंबंधावर आधारलेले दिसते आहे!!

## अस्थिर नैतिकता

का बरे ही स्थिती? कारण समाजमनांत नैतिकतेची कुठल्याही प्रकारची शुद्ध तत्त्वे नाहीत हेच खरे वाटते!! **तेव्हा प्रश्न पडतो की कोणत्या अंतिम शुद्ध पातळीवर हा निर्णय निश्चित व्हावयाला हवा?**

महायुद्ध वा World War ह्या पातळीवरही असाच **गोंधळ** दिसून येईल. ही अवस्था गीतेतील **'अर्जुन विषाद'** ह्या प्रकारची आहे!!

## आध्यात्मिक दृष्टी

**जेव्हा जेव्हा भौतिक जीवनात असे मानवी बुद्धीला न सुटणारे प्रश्न उद्‌भवतात तेव्हा तेव्हा 'भारतीय मन' त्याचे उत्तर 'आध्यात्मिक' पातळीवर भगवान कृष्णाने 'सांगितलेल्या'(किंवा 'गायलेल्या') भगवद्‌गीतेतील दर्शनाकडे आशेने बघते!! कारण या प्रश्नाचे उत्तर भौतिक पातळीवर रमणाऱ्या मानवी जीवनाला अशक्य आहे.** हा निष्कर्ष खरोखर जागतिक भिन्न भिन्न भौगोलिक जीवन जगणाऱ्या सगळ्या मानवजातीचा आहे.



**ह्या प्रश्नाच्या 'बीजप्रश्नाची जाणीव' व त्याचे उत्तर फक्त भारतीय संस्कृतीच्या ऐतिहासिक, पौराणिक व आध्यात्मिकतेच्या इतिहासात शोधले गेले आहे.**

## Two Levels of Consciousness

त्यामुळे ह्या 'दोन पातळ्या वा 'क्षेत्रांची' नांवे भगवद्‌गीतेत **'कुरुक्षेत्र' व 'धर्मक्षेत्र'** ह्या नावाने उद्‌धृत केली गेली आहेत. त्यांतील शास्त्रांची नावे **'भौतिकवाद' व 'आध्यात्मिकवाद'** किंवा **Spiritual Science** व **Material Science** या नावाने त्यांची तत्त्वे जाणता येतील.



**कुरुक्षेत्र**



**'धर्मक्षेत्र'**

**सामाजिक नीतिनियम हे सतत बदलत असतात.** त्यांची निरनिराळी स्वरूपे आपल्याला स्तिमित करतात. महाभारत काळात सूर्य मावळल्यावर दोन्ही

पक्षांची सैन्ये तंबूत परत जात असत. सूर्य उगवल्यावर पुन्हा एकमेकांचा जीव घेण्याच्या कार्यक्रमाला सुरवात होत असे. दुसऱ्या महायुद्धात विषारी वायू वापरणे हे निषिद्ध मानले जात असे. आजही 'न्यूक्लियर वॉर' मध्ये 'ॲटम बॉम्ब व हैड्रोजन बॉम्ब वापरणे हे यूनोच्या 'नीतिमत्तेच्या बंधनात' असलेले वा ठेवलेले अधिकार सर्व राष्ट्रे मान्य करतात. तर दुसऱ्या बाजूला **'Conventional mass Killing'** प्रचलित सर्वसामान्य मानव हत्या करता येईल अशी शस्त्रे व अस्त्रे वापरणे हे सर्वमान्य युद्धनीतीत बसते? आजही, खुद्द भारतात **'बलात्कार'** हे एखाद्या 'पंचायतीच्या नीतितत्त्वात' 'स्त्रियांना' शिक्षा देण्याच्या उपायात मान्य असलेले दिसते आहे!! बंगालमधील एक आमदार विरोधी पक्षाच्या पुढाऱ्यांना त्यांच्या स्त्रियांवर बलात्कार करण्याची धमकी देताना दिसतो आहे!!

कुठल्या लोकशाही व मानवी हक्काच्या नीतिमत्तेत हे बसते?

पण पुन्हा एकदा प्रश्न पडतो, कुठल्या वैश्विक सत्यधर्मात ही नीतिमत्ता बसते? (Cosmic Vs Human Conceived)

**युद्धप्रसंग हे प्रचलित उत्तर**

हेराक्लिटस् (Heraclitus) हा म्हणाला होता की **"War is the Father of all things".**



**त्यामुळे जीवनात 'संघर्ष प्रसंग' सतत निर्माण होणार, पण त्यात 'मृत्यू' ही 'शिक्षापद्धती' मानवी समाजाने आपल्या हाती घेतलेली दिसते आहे.**

त्यामुळे **'धर्म'** हे जर मानवी नीतिमत्त्वाचे आदर्श असेल तर ते असे म्हणते आहे :

"Thou shall not conquer except by battle with thy fellows and thy surroundings, thou shall not even live except by battle and struggle and by absorbing into thyself other life."


दुसऱ्या बाजूला मानवी मनाने 'अहिंसा' तत्त्वाचा आदर्शही हृदयाशी बाळगला. **ऋषी वसिष्ठ यांनी 'आत्मबलांचा वापर ऋषी विश्वामित्राच्या सैनिकी हिंसक सेनेच्या विरुद्ध करून, एक इतिहास घडविला. महात्मा गांधींनी ब्रिटिश राजसत्तेच्या विरुद्ध प्रत्यक्ष हिंसेची शिफारस न करता 'कायदेभंग', 'सत्याग्रह' वगैरे 'अहिंसक चळवळी' लढवून राजसत्तेला बदलण्याचा, थोडासा यशस्वी प्रयत्न ह्या जगात रुजवण्याचा प्रयत्न केला!!** पण, त्यांनाही हिंदू मुसलमानांचे भीषण रक्तरंजित लढे व दंगे बघावे लागले!!

आजही, नक्षलवादी, माओवादी, इंडियन मुजाहूद्दीन व इतर संघटना राजसत्तेच्या बदलासाठीही बेमुर्वत मृत्यू ह्या शिक्षेचा उपयोग उघड हिंसा या मार्गाने करताना दिसत आहेत व प्रत्यक्षात राजसत्तेतील पोलीस, सैनिक व बहुतांशी सामान्य माणूस यांचीच सर्रास हत्या करत आहेत. **त्यामुळे, असा निष्कर्ष निघतो आहे की जगातील 'संघर्ष आणि युद्ध' हा प्रकार कधीही नष्ट होण्याची शक्यता नाही!!**

**महायोगी अरविंद म्हणतात –** [Essays on the Gita] "We must acknowledge 'Kurukshetra', we must submit to the law of 'Life' by 'Death' before we can find our way to the life immortal and further,....

There is no such thing as death, for it is the body that dies and the body is not the man."

"Finite bodies have an end, but that which possesses and uses the body is infinite, illimitable, eternal, indestructible."



त्यामुळे भगवद्गीता काय सांगते?

War considered as an inevitable part of human life, but so restricted and regulated as to serve in life other activities, the ethical and spiritual development, which was then regarded as the whole real object of life, war destructive of their inner life and of "**ethical evolution of the race.**"

**महाभारत कुरुक्षेत्र**

ह्या सर्व भाष्याचा मथितार्थ असा आहे की.... पृथ्वीवरील भौतिक जग हे **कुरुक्षेत्र** आहे. संघर्ष लढा व महाभारत युद्ध हे न टळणारे जीवन आहे. शरीराला मृत्यू आहे, पण माणूस मरत नाही. मानवामध्ये अमर,



अनंत, चिरंतन असे जे काही आहे, ते या युद्धात पणाला लागते व त्याच्या नैतिक, आध्यात्मिक गुणवत्तेचा जो संघर्ष समाजाला व खुद्द मानवाला व्यक्तिगत पडतो त्याचे निराकरण व उन्नतीकरण हा ह्या युद्धाचा खराखुरा लाभ असतो!! एवढेच नव्हे तर त्याचा परिपाक सर्व मानवी जीवनाचा, मानवी योनीचा उत्कर्ष, उद्धार होऊन – 'कॉन्शसनेसचे दैवीकरण' (Divine life) होते. ह्या युद्धाला सामोरे न जाता जर 'अहिंस' ह्या आदर्शवर आधारलेली 'निवृत्ती' किंवा 'अधर्म' किंवा 'तटस्थता' ठेवली तर जे **दुर्गुण, आसुरी प्रवृत्ती** ही जी खरोखर युद्धातील नष्ट होण्याच्या लायकीची गोष्ट तीच ह्या पृथ्वीवर आहे त्या स्थितीत जिवंतच मागे राहते!! **हे आपल्या जीवनदृष्टीला अमान्य आहे!!**

**अदृश्य धर्मक्षेत्र**

**पण ही जीवनदृष्टी 'आध्यात्मिक' आहे आणि ती 'धर्मनीती' वर आधारलेली आहे. हे न दिसणारे 'धर्मयुद्ध' आहे!!**

त्यामुळेच, भगवद्गीतेच्या सुरुवातीला अगदी पहिल्या अध्यायातील १ ला श्लोक काय सांगतो?

**''धृतराष्ट्र उवाच –**
**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।**
**मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय ।।१ ।।''**

धृतराष्ट्र म्हणाला, ''हे संजया, पुण्यभूमी अशा **कुरुक्षेत्रावर** युद्धासाठी जमलेल्या माझ्या पुत्रांनी आणि पांडवांनी काय केले?'' ह्या युद्धात भीष्म ह्या कौरव सेनापतीचा वध करण्यासाठी पांडवांनी कृष्णाच्या सल्ल्याप्रमाणे 'शिखंडी'ला सेनापती केले व त्याच्या आडून अर्जूनाने बाण मारला. भीष्म हा 'इच्छामरणी' होता व स्त्रीवर बाण टाकणार नव्हता. पण ही युक्तीसुद्धा कुंतीला भीष्माकडे पाठवून पांडवांनी मिळवली होती. भीष्मानेच आपल्या गुप्त भेदाचे ज्ञान कुंतीला दिले होते व ह्या गुप्त ज्ञानाचा उलगडा व उपयोग 'शिखंडीला' सेनापती करून कृष्णाने सोडवला.

द्रोणाचार्य ह्यांच्या मृत्यूची गोष्ट अशीच आहे. त्यांच्या मुलाचे नाव अश्वत्थामा होते. तेव्हा 'अश्वत्थामा' नावाच्या हत्तीला मारून व 'अश्वत्थामा' मारला गेला असा प्रचार सैन्यात पांडवांनी केला. तेव्हाही द्रोणाचार्य हे

जेव्हा ध्यानात बसून योगसाधनेने मुलगा जिवंत आहे की नाही याचा शोध घेऊ लागले तेव्हा कृष्णाच्या परवानगीने द्रोणाचार्यांचा धृष्टद्युम्नाने वध केला.

कर्णाचा वधसुद्धा त्याच्या रथाचे चाक अडकल्यावर अर्जुनाच्या बाणाने झाला. तसाच प्रकार दुर्योधनाच्या वधाच्यावेळी झाला. गदायुद्धात भीमाने दुर्योधनाचा वध केला. कमरेखालील भाग गांधारीने डोळे उघडल्यावर त्याचा कमरेखालील भाग वज्ररूप होऊ शकला नाही. कारण त्याला तो भाग झाकण्याचा सल्ला पांडवांच्या वतीने कृष्णाने माळ्याचे रूप घेऊन दिला होता. ही होती 'धर्मयुद्धाची' कृष्ण नीती!!...

**या सर्व घटना हे दाखवतात की पांडवांनी एक प्रकारच्या 'कपट' नीतीने हे विजय मिळवले. मग ह्या प्रकाराला 'Fake Encounter' म्हणावयाचे काय? हे सामान्य युद्धनीतीतत्त्वांवर झाले काय? याचे सरळ उत्तर मिळत नाही. ते नीतितत्त्व कोणते हा भगवद्‌गीतेचा विषय आहे!!**

### कपटी द्यूत व नंतर महायुद्ध

पण कौरवांच्या पक्षाकडून पांडवांवर जे अनेक अन्याय झाले, त्यांचा 'सूड किंवा न्याय' महाभारत युद्धात झाला. त्यातले सर्वांत मोठे कारण हे 'द्रौपदी वस्त्रहरण' प्रसंगाचे आहे असे दिसेल.

पण येथेही पांडव जर द्यूत खेळावयाला गेलेच नसते तर हा प्रसंग ओढवला नसता.

### समझोता प्रयत्न आवश्यक

**पण त्या काळच्या समाज संस्कृतीत द्यूताला आमंत्रण दिल्यावर त्याला नाही म्हणजे हा असभ्य व्यवहार गणला जात होता म्हणून धर्मराजाने आमंत्रण स्वीकारले.** द्यूतात शकुनीमामाने खोटे फसवे फासे वापरले व शेवटी जेव्हा द्रौपदीला पणाला लावले, तेव्हांही धर्मराजाला तो राजमहाल व द्यूत खेळ सोडता आला असता, पण असे द्यूत अर्ध्यावर सोडणे हे समाजसंकेत व्यवहारात बसत नव्हते.

### द्रौपदीचा कूट प्रश्न

ह्याच्याही पुढे द्रौपदीच्या वेळीही धर्मराज हरले, तेव्हाही तिला खेचून नेऊन तिच्या वस्त्रांना दुःशासनाने हात लावला तेव्हा द्रौपदीने कूटप्रश्न उपस्थितीत केले. तिचे ५ पती हे द्यूतामध्ये अगोदर हरल्यावर त्यांना **द्रौपदीला पणाला लावण्याचा काय हक्क होता?**

**हा प्रश्न त्या काळात सुचणे हे 'साधे' नव्हते!! पतीचा पत्नीवर एखाद्या वस्तूवरच्या किंवा (जमीन जुमल्याच्या) जातीचा हक्क समाजमान्य होता.**

त्याचे समर्थन खुद्द धर्मराजाच्या वचनाने झाले. जेव्हा राजमहालांतील हा 'वस्त्रहरणाचा' अत्यंत हीन प्रसंग ओढवला व भीम गदा उगारून कौरवांवर धावून जाऊ लागला, तेव्हा त्याला रोखण्याचे काम खुद्द धर्मराजाने केले!!

### समाजाचे वस्त्रहरण

धर्मराज म्हणाले की, 'द्रौपदीला द्यूतामध्ये पणाला लावल्यानंतर हरल्यामुळे **ती आता कौरवांची दासी झाली आहे. तेव्हा आपण विरोध करू शकत नाही.**' मला वाटते की महाभारताचा काळ हा द्वापार युगाचा काळ होता. **त्या काळात, 'दासीचे वस्त्रहरण' राजमहालात झाले, तर त्या सभेत अशा कृत्याला कुणाचाही आक्षेप नव्हता योग्य व असे असणे हे काय वाजवी व समाजमान्य होते?**

तेव्हा **सामाजिक 'नीतिमत्तेची ही चौकट'** आपल्याला आज पटत नाही, पण त्या काळात या चौकटीच्या बाहेर कौरव, पांडव राजदरबारातले इतर राजे, शूर वीर हेही जाऊ शकत नव्हते!!

### बदलणारे नीतिनियम

पण महत्त्वाचे हे आहे की समाजनीतीचे व्यवहार सारखे बदलत असतात व हे जरी मान्य झाले तरीदेखील महर्षी व्यासांनी जे महाभारत लिहिले. तेव्हां त्यांनी ह्या प्रसंगात, जो दुर्धर व उघड उघड एका साध्वी द्रौपदीसारख्या स्त्रीवर हा जो भयानक प्रकार घडला, त्याचे वर्णन करून व त्यावर प्रतिक्रिया म्हणून जे महायुद्ध झाले व १८ अक्षौहिणी सैन्य, सर्व कौरव व पांडवाचीही मुले यांचा संहार झाला, तो प्रसंग रंगवून सांगून काय साधले?

### व्यासोत्च्छिष्टम् 'गीतारत्न'

कारण 'महाभारत' ही एक 'काल्पनिक पुराणकथा आहे की खरोखर 'एक इतिहास' आहे हा वाद उत्पन्न होतो. त्यावर भाष्य करताना महायोगी अरविंद म्हणतात की त्यांना **ही महाभारत कथा की इतिहास** या वादात पडायचे नाही, पण ह्या महाभारतात जे आध्यात्मिक मौल्यवान रत्न हाती लागले ते श्रीकृष्णाने म्हणजे खुद्द भगवानाच्या अवताराने गीतोपदेश केला, ते जास्त महत्त्वाचे आहे, ते म्हणतात,

"In the Gita there is very little that is meroly local or temporal; and its spirit is so large, profound and universal that even this little can be universalised."

"Our object, then in studying the Gita will not be a scholastic or academic scrutiny of its thought..."

"We approach it for help and light and our aim must be to distinguish its essential and living message that is in it, on which humanity has to seize for its highest spiritual welfare."

"But as bearing upon a practical crisis in application of ethics and spirituality to human life."

हे उतारे महायोगी अरविंदांच्या **"Essays on the Gita"** ह्या पुस्तकातून घेतले आहेत.

पण मला हे नमूद करावेसे वाटते की 'भगवद्‌गीता' ह्यासारख्या भारताला ललामभूत असणाऱ्या ''आध्यात्मिक'' ग्रंथावर अनेक भाष्ये झाली, पण त्यामध्ये हे पुस्तक ह्या सर्व भाष्यांपेक्षा निराळे आहे. ह्या पुस्तकातून एखाद्या जादूगारासारखे ह्या पृथ्वीवरील मानवाला त्याच्या भौतिक जीवनामध्ये पडणाऱ्या सर्व प्रश्नावर गीतेचे मार्गदर्शन हे सुबोध सरळपणे सतत सर्वकाळ मिळते आहे. याच नव्हे तर मानवी जीवनात भविष्यात पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे व मानवाचा अंतिम ध्येयाकडे जाणारा मार्ग कोणता व त्यामध्ये दिशा कोणती हेसुद्धा उमजत राहील!!

### पुनश्च बनावट द्वंद्व

आता आपल्या 'Fake Encounter' (''फसवे द्वंद्व'') ह्या नैतिक कोड्याकडे वळू या!!

प्रथम, हा कोडे पडणारा मानवी नैतिक मूल्याचा प्रश्न, दोन्ही बाजूला असणाऱ्या वैश्विक सत्याच्या अज्ञानातून उद्‌भवला आहे, हे समजून येईल!!

द्यूत व खोटे फासे, शकुनीमामाचा कुटीलपणा व पुरुष नि स्त्री यांचे परस्पर नाते व हक्कांचे प्रश्न बघा!! ह्याबद्दल आश्चर्य म्हणजे सत्ताधारी कौरवांना ही सामाजिक प्रचलित पद्धती अन्यायमूलक वाटत नाही आणि त्यांची मने व दृष्टी ही धृतराष्ट्र व गांधारीसारखी डोळे बांधून सरळ बसली आहे असे दिसेल.

**सत्ताधरी पक्षाला ह्या 'सिस्टिम' (व्यवस्था) बद्दल काही गैर वाटत नाही.** एवढेच नव्हे तर आश्चर्य म्हणजे **खुद्द पांडवांना व धर्मराजालाही ह्या सिस्टिम बद्दल काही तक्रार नाही.** धर्मराज तर आपला धाकटा बंधू भीमाला त्याच्या रागाबद्दल व चीड येण्याबद्दल व त्याचा प्रतिकार करण्याच्या वृत्तीला, एक तत्कालीन समाजमूल्याचा उल्लेख करून शांत करतात!! **कोणती ही जीवनमूल्ये? दासीचे(?) राजमहालात विवस्त्र होणे? फक्त द्रौपदीला ह्या अन्यायाचा साक्षात्कार होतो? आजही भारतात ह्या व अशाच घटना होताहेत.**

**याचा अर्थ 'आजचे कौरव व पांडव सत्ताधारी' अजूनही अनेक अन्यायमूलक नीतिकल्पना हृदयात व मनात सांभाळून बसले आहेत.**



काही मानव जे अल्पसंख्य आहेत, ज्यांच्या ठिकाणी इतकी तीव्र प्रतिकारशक्ती नाही कारण **त्यांनाही शाश्वत मूल्ये कोणती व का यांचा पत्ता नाही.** कारण **त्यांचा 'वैश्विक ऋत व सत्य' संकल्पना व शरीरबद्ध मानवी कॉन्शसनेसचा जन्म, मृत्यू, पुनर्जन्म व विश्वाच्या संसारचक्रांतून होणाऱ्या जीवात्म्याच्या अंतिम सत्य व दिव्य सात्त्विकतेच्या राजमार्गाची रस्त्याची बिलकूल माहिति नाही ("Road to Divinity through the cycle of births, death, Rebirth and spiritual Evolution")** त्यामुळे श्रीकृष्णाकडे जी दृष्टी आहे, जी सत्य व सात्त्विक मूल्यांची ज्ञानमय व कृतिमय जाणीव आहे ती दिसत नाही. म्हणजे तितकी स्पष्ट दिसत नाही. खात्रीयुक्त ज्ञान नाही!! 'द्रौपदीचे वस्त्रहरण' होताना कौरव-पांडव दोघेही उघड्या डोळ्याने बघत होते. धृतराष्ट्र व गांधारी तर एक आंधळे असल्याने आणि एकाच्या डोळ्यावर पट्टी बांधून असेच बसले होते. भीष्माचार्य, द्रोणाचार्य, कर्ण हेसुद्धा मूग गिळून स्वस्थ बसले होते. आणि **दुर्योधनासारखे व्यक्तित्व, मला धर्म समजतो, पण निसर्गाप्रमाणे मला जी प्रवृत्ती प्राप्त झाली आहे, त्याप्रमाणे मी वागतो. मला काहीही निराळे करता येणार नाही'' असा 'बुद्धिवादी विचार' सांगून असमर्थता दाखवते.** हा युक्तिवाद की दुर्योधनाचे स्वधर्माचरण? पण एवढ्याने मानवी समाजाचे समाधान होते हे बरोबर नाही. ह्याची कारणे, संघर्षाची कारणे, संहाराची शिसारी येणे, स्वतःच्या द्रोणाचार्य, भीष्माचार्य या गुरुस्थानी असणाऱ्यांची हत्यासुद्धा युक्तीने किंवा गैर पद्धतीने करावी लागते, ती का हे समजलेच पाहिजे. **श्रीकृष्णावरसुद्धा 'Fake Encounter' चा आरोप एका मापदंडाने समाजाच्या प्रचलित स्थितीत होऊ शकतो!!** प्रत्यक्ष श्रीकृष्णाला द्वापार युगात अवतार घेऊन प्रकट होऊन पांडवांच्या बाजूने त्यांच्या रथाचे सारथ्य करावे लागले. हे कां? ह्याचे उत्तर 'धर्मक्षेत्रा'च्या पातळीवर मिळते!! हा सारथी आध्यात्मिक जगद्गुरू आहे!!

**आत्मग्लानी, अर्जुन विषाद व आत्मोन्नती पुरुषोत्तम योग**

**तर ही भौतिकातील आत्मग्लानी होय किंवा एका वेगळ्या दृष्टीने समाजाच्या अनंत काळच्या प्रवासांत जेव्हा एखाद्या 'अर्जुनाला' विषाद उत्पन्न होतो तेव्हा त्याचे कारण त्याला उमजत नाही!! तेव्हा, त्याला युद्ध करणे हे 'कर्म' करावे लागते.** ह्या युद्धात दुष्टांचा नाश म्हणजे त्यांच्या शरीरातील प्राणाचा त्याग घडवून आणणे, हा खरा स्वधर्म ठरतो. एवढ्या भीषण संहारानंतरही प्रश्न पूर्णपणे सुटत नाहीत. **सर्वनाशाने पृथ्वीवर दुःखे कायमच राहताना दिसते. कारण, ह्याचे उत्तर प्रत्येक व्यक्तीचे व समाजाचे अध्यात्ममार्गाने आत्मोन्नती होणे हे आहे. हा 'पुरुषोत्तम योग' होय!!**

**त्यासाठी 'श्रीमद् भगवद्गीतेचा' उपदेश (गायनमार्गाने) आवश्यक ठरते.**

(क्रमशः)

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाइल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@gmail.com.

(कव्हर २ वरून – **संपादकीय**)

संग्रहालयांमधून पाच ते सात हजार वर्षांपूर्वीच्या मेसोपोटेमियन संस्कृतीचे अवशेष जतन करण्यात आले होते. अमेरिकेने चालू केलेल्या या युद्धामुळे या संग्रहालयातील वस्तू संपूर्णपणे लुटल्या गेल्या. अनेक प्राचीन तसेच ऐतिहासिक स्थळांचा विध्वंस झाला. श्रेष्ठत्वाचा टेंभा मिरविणाऱ्या या देशानी आपल्या देशातील ग्रंथालये जरी चांगल्या प्रकारे सांभाळली असली तरी त्यांच्या मुळेच संस्कृतीचा झालेला हा विध्वंस अक्षम्य आहे. हाच सांस्कृतिक विध्वंस पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक युद्धांत युरोपमध्येही झाला होता.

अर्थातच या विध्वंसाचे तिसरे कारण म्हणजे सांस्कृतिक बधिरता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर गेल्या साठ वर्षांत या देशामधील ऐतिहासिक वस्तू, मूर्ती आणि हस्तलिखितांचे आपण जे अनास्थेने नुकसान केले आहे, त्याला जगात तोड नाही. संस्कृती आणि भाषेबद्दल आक्रस्ताळेपणाने बोलणारे राजकिय पक्ष तर या सांस्कृतिक बधिरतेमध्ये आघाडीवर आहेत. आजच्या भारतीय संस्कृतीची सर्व चिन्हे, वस्तू, हस्तलिखिते आणि ऐतिहासिक स्थळे यांची जास्तीत जास्त निगा, स्वातंत्र्यपूर्व वसाहतवादी राज्यकर्त्यांनी राखलेली दिसून येते. यापेक्षा दैवदुर्विलास तो काय असावा?

१९८४ साली ठाण्यामध्ये 'प्राच्यविद्या अभ्याससंस्था' स्थापन झाली. गेल्या तीस वर्षांत संस्थेने अनेक मूर्ती आणि वस्तू कष्टाने मिळविल्या आणि जतन केल्या. याच कालावधीमध्ये सुमारे ४०,००० दुर्मीळ पुस्तके आणि ३००० हस्तलिखितेही संस्थेने मिळविली. श्री. गोविंद स्वरूप या ठाणे महानगरपालिकेच्या स्थापनेनंतरच्या दुसऱ्या आयुक्तांच्या संस्कृतिप्रेमामुळे नौपाडा येथील शाहू मंडईमध्ये संस्था शांतपणे गेली २५ वर्षे संशोधनकार्य करीत होती. अर्थातच यामुळे चौरस फुटांच्या हिशोबांमध्ये गणित करणाऱ्या महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना काहीच फायदा दिसत नव्हता. सुमारे तीन वर्षांपूर्वी श्री. राजीव या आयुक्तांनी निवडणूकांचे कारण देऊन संस्थेला तेथून उखडून टाकले, आणि सर्व सोयीसुविधा देतो असे सांगून हाजुरी येथील इमारतीमध्ये हलविले. गेल्या तीन वर्षांत संस्थेला कमीत कमी सुविधा प्राप्त करून द्याव्यात आणि पावसामुळे होणारी तेथील गळती थांबवावी म्हणून अनेक पत्रे तत्कालीन आणि सध्याचे आयुक्त श्री. असीम गुप्ता यांना लिहिण्यात आली, पण संवेदनाशून्य व बधिर अशा महापालिकेच्या यंत्रणेवर त्याचा काडीचाही परिणाम झाला नाही. आजही पावसाने गळणाऱ्या छताखाली हा दुर्मीळ संग्रह जपण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न संस्था करीत आहे. नोकरशहां इतकीच बधिरता ठाण्याच्या लोकप्रतिनिधींनी दाखविली आहे. कोट्यावधी रुपये खर्चाच्या कधी 'थीम' पार्कच्या तर कधी येऊर येथे पर्यटनक्षेत्र बनविण्याच्या योजना मात्र अव्याहतपणे मांडल्या जात आहेत.

लोकशाहीमध्ये सभ्य नागरिकाला अर्जविनंत्या एवढाच मार्ग उपलब्ध असतो. अर्थातच सुशिक्षित सुसंस्कृत समाजामध्येच अशा प्रयत्नांचा आदर केला जातो. माणसाचा जन्म आणि मृत्यू त्याच्या हातात नसतो; परंतु जेव्हा एका असंस्कृत, बधिर राजकीय आणि सरकारी नेतृत्वाखाली नागरिकाला जगावे लागते तेव्हा सर्व आशा, आकांक्षा आणि सर्जनशीलतेचा कोंडमारा झालेला असतो. एक वेळ युद्धातून सुटका करून घेता येईल; पण भ्रष्ट, लाचार, संवेदनाशून्य आणि बधिर राजकीय यंत्रणेतून मुक्तता ही फक्त क्रांतीतूनच मिळू शकते.

**विजय वा. बेडेकर**

●●●

# चिल्का सरोवराचे नवे समुद्रमुख

*श्री. नरेंद्र गोळे यांचा चिल्का सरोवरावरील लेख – संपादक*

सुजलाम् सुफलाम् भरतभूमीला निसर्गसंपदेची मुळीच कमी नाही. मात्र विशिष्ट भौगोलिक रचनेमुळे भारताच्या निरनिराळ्या भागांत, निरनिराळ्या प्रकारच्या नैसर्गिक समस्या उद्भवत असतात. हिमालयाच्या पायथ्याशी उन्हाळ्यात हिम वितळून, नद्यांना पूर येतात. भारताच्या मुख्य भूमीवरील नद्यांना मौसमी पर्जन्यापायी पूर येतात. पूर्व किनाऱ्यावर वादळांची संकटे कोसळतात. तर अनेक भूकंपप्रवण क्षेत्रांना भूकंपांचा धोका संभवतो. राजस्थानसारख्या शुष्क प्रदेशात उन्हाळ्यात उष्माघाताने माणसे दगावतात. दक्षिण भारतात अपुऱ्या पावसामुळे दुष्काळ ओढवतात. मात्र ओरिसात पूर्वी जो सदोदित पूरपरिस्थितीचा सामना करावा लागे, त्याचे कारण होते पूर्व किनारपट्टीची भौगोलिक संरचना. इसवी सन २००० मध्ये भारत सरकारने चिल्का सरोवरास नवे समुद्रमुख उघडून दिले. तेव्हापासून मात्र ओरिसातील पूरपरिस्थिती पुष्कळच प्रमाणात नियंत्रण प्राप्त झाले आहे. त्याच विकासाची ही सुरस कहाणी आहे.

भारताच्या राजकीय नकाशात ओरिसा ज्या दिशेला, ज्या ठिकाणी आढळून येतो, जवळपास त्याच दिशेला, त्याच ठिकाणी, नैसर्गिक ओरिसाच्या नकाशात चिल्का सरोवर दिसून येते. चिल्का सरोवराची उपग्रहातून काढलेली चित्रे, ओरिसातील जनजीवन चिल्का सरोवराच्या परिसरप्रणालीवर कशा प्रकारे अवलंबून आहे ते चांगल्या प्रकारे दर्शवतात.


ब्रह्मपुत्रा आणि गंगा नद्यांच्या मुखाशी जे मोठे आखात निर्माण झाले ते म्हणजेच बंगालचा उपसागर. नद्यांच्या ओघामुळे निर्माण होणाऱ्या सागरी प्रवाहांनी होणारे भूमीचे रक्षण, भारताच्या पूर्व किनाऱ्यास जिथे कठीण कातळ उघडा पडला तिथवर जाऊन थांबले. मग कठीण कातळास उल्लंघून भूमीचा ऱ्हास करणे सागरी प्रवाहांना आणि लाटांना शक्य राहिले नाही. मात्र भूमीमधील वेगवती नद्यांचे प्रवाह जलौघांना समुद्रपातळीपर्यंत आणतच राहिले. मग त्याच कातळांनी ते जलौघ सागरास पावते होण्यापासून रोखले गेले. अशामुळेच, महानदीच्या मुखाशी गोड्या पाण्याचे भव्य सरोवर निर्माण झाले. ते म्हणजे चिल्का. आता निरंतर येणारे जलौघ, ते सरोवर साठवणार तरी किती? शेवटी सरोवराचे पाणी सागरास मिळणे क्रमप्राप्तच होते. ते सम्रदाची वाट शोधत गेलेच. ते आहे महानदीचे मुख. चिल्का सरोवराचे मुख. मग याच मुखातून भरतीच्या लाटांनाही सरोवरात शिरण्याचा मार्ग सापडला आणि चिल्का सरोवराचे पाणी खारे झाले.


जगभरातील सर्व मोठया नद्या असंख्य मुखांनी समुद्रास मिळतात. त्या नद्या जिथे जिथे समुद्रास मिळतात तिथे तिथे मोठाले त्रिभुज प्रदेश निर्माण झालेले दिसून येतात. महानदी मध्य भारतातील एक मोठी पूर्ववाहिनी नदी आहे. अमरकंटकच्या डोंगरात, विंध्य पर्वतात उगम पावून ती नदी गंधमादन पर्वतश्रेणींतून वाहत वाहत मैदानात, कटकपाशी उतरते. कटक शाहर हे पूर्वी ओरिसाच्या राजधानीचे शहर होते. कटकपाशी महानदी अनेक मुखांनी बंगालच्या उपसागराकडे झेपावू लागते.

त्यांतला सगळ्यात दक्षिणेकडील फाटा सरोवरात परिणत होतो. महानदीच्या मुखाशी त्रिभुज प्रदेश तर आहेतच, शिवाय साडेअकराशे वर्ग किलोमीटर विस्ताराचे भव्य चिल्का सरोवर आहे. चिल्का सरोवर उत्फुल्ल होऊन वाहू लागते आणि सागराची वाट शोधते. दोन मुखांशी जाऊन ह्या शोधाचे समापन होते.

उत्तरेचे मुख आहे जुने आणि दुसरे दक्षिणेकडले मुख आहे नवे. इसवी सन २००० पूर्वी हे नवे समुद्रमुख नव्हते. २३ सप्टेंबर २००० रोजी ते उघडण्यात आले. त्याची अद्भुत कहाणी आहे.

काळाच्या ओघात जुन्या समुद्रमुखाशी गाळ साठत गेला. मुख अरुंद होत गेले. उथळ होत गेले. मग चिल्का सरोवराची जल-पातळीही उंचावत गेली. गावे पाण्याखाली बुडू लागली. पावसाळयात पूरपरिस्थिती उद्भवू लागली. या समस्येवर इलाज शोधला जाऊ लागला. पुण्याच्या केंद्रिय जल




आणि शक्ती संशोधन स्थानक (Central Water and Power Research Station), यांच्या शोधाचे फलित म्हणून असा निष्कर्ष काढण्यात आलेला होता की, कायलातील[१] क्षार आणि लाटांचे ओघ (flux) कायलाचे मुख मुख्य कायलाच्या जवळ आणल्याखेरीज सुधारणार नाहीत. त्रिमिती आकडेशास्त्रीय प्रारूप (3-dimentional numerical prototype) अभ्यासाच्या आधारे, त्यांनी शिफारस केली की १०० मीटर रुंद आणि कायलातील कमीत कमी जलपातळीच्या २.५ मीटर खालच्या पातळीवर, एक नवे मुख निर्माण करायला हवे. म्हणजे कायलातील क्षारांशाचा ओघ ४०% पर्यंत सुधारेल आणि कायलातील लाटांचा ओघ ४५% पर्यंत सुधारू शकेल. यामुळे कायलातील पर्यावरणप्रणाली पुनः संजीवित होऊन अपेक्षित क्षारांशाची पातळी म्हणजेच उन्हाळ्यात उत्तर भागातील क्षारांश लाखात १.५ भाग- साध्य करता येईल. (कायलातील[१]= Lagoon = उडिया भाषेत ह्रदो.)

यानुसार नवे कायलमुख सिपकुड गावाजवळ २३ सप्टेंबर २००० रोजी समुद्रास खुले करण्यात आले. हे, केंद्रीय जल आणि शक्ती संशोधन स्थानक, पुणे व समुद्र अभियांत्रिकी केंद्र (Ocean Engineering Centre), भारतीय प्रौद्योगिकी संस्था (Indian Institute of Technology), चेन्नई यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली साध्य करण्यात आले. राष्ट्रीय समुद्रतळ-आलेखन संस्था (National Institute of Oceanography) गोवा, यांनी कायलातील परिवर्तनांची देखरेख केली.

२००१ मध्ये चिल्का सरोवरातील बेटांवरची व आसपासची खेडी प्रभावित झाली नाहीत. नंतरच्या दोन-तीन वर्षांत खेकड्यांचे उत्पादान १०-१५ पटींनी वाढले व सरोवरातील क्षारांश दुपटीने वाढला. शिवाय जुन्या समुद्रमुखातून होणाऱ्या क्षीण जलौघापायी, ५०,००० हेक्टर जमिनीवरील खरीपाच्या पिकांचे होणारे नुकसान नवे समुद्रमुख उघडताच थांबले, ही उपलब्धी चिल्का विकास प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर नमूद केलेली आहे.

निसर्गाच्या निरंतर केलेल्या अभ्यासामुळे, गेल्या वर्षी (२०१३ साली) आलेल्या सुनामीचा सामना करतानाही, त्या सुनामीमुळे झालेली हानी कितीतरी प्रमाणात कमी राहिली. नगण्य राहिली. राष्ट्रीय नैसर्गिक आपत्तींना तोंड देत असताना, आपण राष्ट्र म्हणून जो विकास केला आहे, त्याचे पुरेसे मोल आपल्याला असत नाही. त्याची माहितीही कित्येकदा आपल्याला असत नाही. ती व्हावी आणि भारताच्या खऱ्याखुऱ्या बलस्थानांची ओळख आपण जाणीवपूर्वक करून घ्यावी, ह्याकरताच हा विकासाचा वेध घेतलेला आहे.

संदर्भ :

१. चिल्का विकास प्राधिकरण-परिसर पुनःस्थापना http://www.chilika.com/eco-restoration.php

२. महानदीचे मुख http://nvgole.blogspot.in/2008/11/blog-post.html#links

**श्री. नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) -४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

चंदनाच्या चिंधड्या केल्या तरी सुगंध देण्याचा आपला गुणधर्म ते शेवटपर्यंत सोडत नाही.

# कै. मोहन पाठक सरांना सादर श्रद्धांजली

## ''दिशा दिशांतून भास तुझा रे''



काल शाळेच्या ऑफिसात आले होते. जोशीबाईंना म्हटले, माझे हे नवीन पुस्तक. 'अबकी बारी अमेरिकावारी' त्याचे परीक्षण लिहायला पाठकसरांना सांगा. त्या दोन मिनिट गप्पच. मग हळू आवाजात म्हणाल्या, पाठकसर गेले. तरी मी म्हटले की कुठे गेले? 'ते निवर्तले', 'त्यांचे निधन झाले' मला धक्काच बसला. पाठकसरांची प्रत्यक्ष भेट व्हायची नाही, पण त्यांचा फोन यायचा दिशासाठी लेख पाठवा म्हणून.

'सांगे गीता' या सद्धर्मने प्रकाशित केलेल्या भगवद्गीतेवरील माझ्या पुस्तकातील अठराही अध्यायांवरील लेख प्रथम दर महिन्याला दिशातून प्रसिद्ध झाले. आता त्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली आहे. त्यानंतर 'गीताविश्व' या सदरातून मी गीतेवरील अनेक पुस्तकांचा (वीस-बावीस पुस्तकांचा) परिचय 'दिशा' तून करून दिला. यासाठी पाठकसरांनीच तुम्ही यावर लिहा म्हणून मला प्रोत्साहित केले. माझ्याकडून ते लिहून घेतले. आता त्याचेही पुस्तक प्रकाशित होत आहे. सरांच्या प्रोत्साहनामुळेच हे लिखाण माझ्याकडून झाले.

त्यांच्या अचानक जाण्याने खूप हळहळ वाटली. ते 'दिशा' चे कार्यकारी संपादक तर होतेच, पण आधारस्तंभही होते.

त्यांच्या जाण्याने 'दिशा' शोकाकुल झाल्या आहेत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती व सद्गती देवो. त्यांच्या कुटुंबीयांच्या व 'दिशा'च्या कार्यकारी मंडळाच्या दुःखात आम्ही दिशांचे लेखकही सहभागी आहोत.

**आशा भिडे**

# श्रीमद् भगवद्गीता - अध्याय अठरावा
# संन्यास योग - कळसाध्याय

*कै. शंकरराव मठांनी दिशासाठी दिलेल्या लेखमालेतील १८ व्या अध्यायावरील हा लेख. या लेखाच्या माध्यमातून कै. मठांना आम्ही विनम्र अभिवादन करतो. – संपादक*

## श्लोक १ ते १२ त्याग यासंबंधीचा विचार

अर्जुन म्हणाला – हे कृष्णा, केशी दैत्याचा नाश करणारा आणि इंद्रियांना स्वाधीन ठेवणारा असा तू आहेस. मला संन्यास आणि त्याग यांचे रहस्य निरनिराळे समजून घ्यावयाचे आहे. श्रीकृष्ण म्हणतात – ज्ञानी लोक या काम्यकर्माचा त्याग करणे याला संन्यास म्हणतात आणि विद्वान लोक सर्व कर्मफळांचा त्याग करणे याला त्याग म्हणतात.

कित्येक विद्वान म्हणतात की सर्व प्रकारची कर्मे दोषयुक्त आहेत. म्हणून ती टाकणे योग्य आहे. दुसरे विद्वान म्हणतात की यज्ञ–दान–तप ही कर्मे त्याज्य नव्हे. हे श्रेष्ठ भारतीय वीरा, या त्यागासंबंधी माझा निर्णय ऐक. हे पुरुषश्रेष्ठा, त्याग हा तीन प्रकारचा सांगितला आहे. यज्ञ, दान आणि तप कर्मे सोडता कामा नयेत. ती केलीच पाहिजेत, याचे कारण असे की यज्ञ, दान, तप कर्मे ही मन स्वाधीन ठेवणाऱ्यांना पवित्र करणारी आहेत. ही सर्व कामे आसक्ती आणि फलोपभोगाची इच्छा सोडून करावीत. हे पार्था, माझे निश्चित व उत्तम मत आहे.

नियत कर्मांचा त्याग करणे योग्य नव्हे जर कोणी अज्ञानवश होऊन नियतकर्माचा त्याग करील तर त्य त्यागाला तामस त्याग म्हणतात. दुःख समजून शरीराला कष्ट होतील या भयाने जे कर्मे सोडतात तो राजस त्याग आहे. म्हणून त्याग करूनही त्याला त्यागाचे फळ मिळत नाही. हे अर्जुना, आपले कर्तव्य आहे असे समजून जे नियत कर्म आसक्ती आणि फळभोगेच्छा सोडून केले जाते त्या त्यागाला सात्त्विक त्याग म्हणतात.

जो त्यागी सत्त्वयुक्त, बुद्धिमान आणि संदेहरहित होतो तो कौशल्यहीन कर्माचा द्वेष करीत नाही आणि कौशल्ययुक्त कर्मात रममाणही होत नाही. देहधारण करणाऱ्या मनुष्यास कर्मांचा संपूर्ण त्याग संभवनीय नाही. म्हणून जो कर्मफळाचा त्याग करतो त्यालाच त्यागी म्हटले जाते.

अनिष्ट, इष्ट आणि संमिश्र असे कर्मांचे तीन प्रकारचे फळ, कर्मफळाचा त्याग न करणाऱ्यांना मिळते; पण कर्मफळाचा त्याग करणाऱ्या संन्याशांना त्या तिन्ही फळांची प्राप्ती केव्हाही होत नाही.

## श्लोक १३ ते १७ कर्म प्रस्थापित होण्याची कारणे (सांख्य सिद्धान्ताप्रमाणे)

हे अर्जुना, सर्व कर्मांच्या सिद्धीसाठी कर्मदोषाचा अंत करणाऱ्या सांख्यशास्त्रात ही पाच कारणे सांगितली आहेत. ती तू लक्षात ठेव. आधारक्षेत्र, कर्ता, अनेक प्रकारची साधने, अनेक प्रकारच्या क्रिया ही चार आणि पाचवे दैव शरीर, वाणी आणि मन यांच्याद्वारे योग्य वा अयोग्य जे काही कर्म मनुष्य करतो त्याची ही पाच कारणे असतात.

हे खरे असता जो केवळ स्वतःला कर्ता समजतो तो दुर्मती संस्कारहीन बुद्धीमुळे काहीच जाणत नाही. ज्याला अहंकाराचा भाव नाही, ज्याची बुद्धी मलिन नाही तो या सर्व लोकांचा वध करूनही वध न केल्याप्रमाणेच असल्याने बंधनात पडत नाही.

## श्लोक १८ ते ४० तीन गुणांप्रमाणे ज्ञान, कर्म, कर्ता, बुद्धी, धृती, सुख यांतील वेगळेपणा

ज्ञान, ज्ञेय आणि ज्ञाता हे तत्त्व कर्माच्या प्रेरणेत आहे व साधनक्रिया आणि कर्ता ही तीन प्रकारची कर्माची अंगे आहेत. ज्ञान, कर्म आणि कर्ता यांचे गुणांच्या विविध भेदामुळे तीन प्रकार होतात. त्यांचे वर्णन तू आता ऐक.

ज्या योगे जीव परस्पर विभक्त असलेल्या सर्व भूतांत अविभक्त आणि अविनाशी भाव पाहतो ते ज्ञान सात्त्विक आहे. ज्या ज्ञानाने वेगळेपणाचा अनुभव येत असल्याने सर्व भूतांत निरनिराळ्या प्रकारचे नाना भाव दिसून येतात ते ज्ञान राजस आहे. एकाच कार्यात सर्व काही आहे असे समजून आसक्त होणे, जे निर्हेतुक, रहस्यहीन आणि अल्प असते त्याला तामस ज्ञान म्हणतात.

फळाची इच्छा न करता जे नियत कर्म आसक्तीरहित आणि रागद्वेषरहित होऊन केले जाते. त्याला सात्त्विककर्म म्हणतात. पण जे कर्म फळाच्या इच्छेने अहंकाराने आणि मोठ्या आयासाने केले जाते त्याला राजस कर्म म्हणतात. परिणाम हानी, हिंसा आणि आपले सामर्थ्य यांचा विचार न करताच जे कर्म मोहाने केले जाते त्याला तामस कर्म म्हणतात.

जो अनासक्त आणि अहंकारशून्य, धैर्य आणि उत्साह यांनी युक्त, सिद्धी आणि असिद्धी यासंबंधी हर्ष विषाद न मानणारा आहे तो सात्त्विक कर्ता होय. जो भोगी, कर्मफळाची इच्छा करणारा, लोभी, हिंसाशील, स्वच्छ, हर्षशोक करणारा तो राजस कर्ता होय. जो अव्यवस्थित, अकुशल, संस्कारहीन, सुस्त, शठ, नीच, परोत्कर्ष सहन न करणारा, आळशी, विषादी, दीर्घसूत्री कर्ता आहे त्याला तामस कर्ता म्हणतात.

हे धनंजया, बुद्धी आणि धृती यांचे गुणानुसार तीन प्रकार होतात. त्यांचे पूर्ण व पृथक वर्णन सांगतो, ऐक. हे पार्था, जी बुद्धी प्रवृत्ति-निवृत्ति, कार्य-अकार्य, भय-अभय, बंध-मोक्ष यांना यथार्थपणे जाणते ती बुद्धी सात्त्विक होय. हे पार्था ज्या बुद्धाने जीव धर्म-अधर्म, कार्य - अकार्य, यांचा भेद यथार्थपणे जाणत नाही ती बुद्धी राजस होय. हे पार्था, जी अज्ञानाने पछाडलेली बुद्धी अधमांला धर्म समजते आणि सर्व गोष्टींना विपरीत मानते ती बुद्धी तामस होय.

हे पार्था, ज्या एकनिष्ठ धृतीने मन, प्राण आणि इंद्रियक्रिया यांचे मनुष्य साम्य वृत्तीने धरण करतो ती सात्त्विक धृती होय. हे अर्जुना, ज्या धृतीमुळे आसक्त बुद्धीने फलोपभोगाची आकांक्षा धरून मनुष्य धर्म अर्थ आाणि काम धारण करतो ती राजस धृती होय. हे पार्था, दुष्ट बुद्धीचा मनुष्य धृतीने निद्रा, भय, शोक, खेद आणि मद ही सोडत नाही ती तामस धृती होय.

हे भरतश्रेष्ठा, आता तीन प्रकारच्या सुखांचे भेद ऐक या सुखांत जीव अभ्यासाने रमतो आणि दुःखाचा नाश होतो. जे आरंभी विषासारखे लागते पण परिणामी अमृतासारखे असते आणि जे आत्मबुद्धीच्या प्रसन्नतेत उत्पन्न होते त्याला सात्त्विक सुख म्हणतात. जे विषयाशी इंद्रियांचा संयोग झाल्यामुळे उत्पन्न होऊन प्रारंभी अमृतासारखे लागते, पण शेवटी विषासमान होते ते सुख राजस होय. जे आरंभी आणि शेवटी आत्म्याला मोहात घालते, आणि जे निद्रा, आळस आणि प्रमाद यांपासून उत्पन्न होते त्याला तामस सुख म्हणतात. जी वस्तू या प्राकृतिक तिन्ही गूणांपासून अलिप्त असेल ती पृथ्वीत, धुलोकात अथवा देवातही नाही.

**श्लोक ४१ ते ४८ फळसहित वर्णधर्म विचार**

हे श्रेष्ठ तप करणाऱ्या अर्जुना, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र यांची ही कर्मे स्वभावजन्य गुणामुळे विविध झाली आहेत. शम, दम, तप, शुद्धता, सहनशक्ती, सरळपणा, ज्ञान, विज्ञान आणि आस्तिकृता ही ब्राह्मणाची स्वभावजन्य कर्मे आहेत. शौर्य, तेजस्विता, धैर्य, दक्षता, युद्धात माघार न घेणे, दान आणि शासनप्रमुख ही क्षत्रियांची स्वभावजन्य कर्मे होत, शेती, गोरक्षण आणि वाणिज्य हे वैश्याचे स्वभावजन्य गुण आहेत आणि परिचर्या हा शूद्रांचा स्वभावजन्य गुण आहे.

आपआपल्या कर्मांत जो तत्पर असतो, तो मनुष्य उत्तम सिद्धी मिळवितो, स्वकर्मतत्पर असणाऱ्याला ज्या प्रकारे सिद्धी प्राप्त होते ते ऐक. ज्यापासून सर्व भूतांची प्रवृत्ती होते आणि ज्याच्यामुळे हे सर्व जग व्याप्त झाले आहे त्या ईश्वराला स्वकर्मांच्या द्वारे पूजल्यास मनुष्याला सिद्धी प्राप्त होते.

गुणहीन असा वाटणारा स्वधर्म आचरणात सुगमता वाटणाऱ्या परधर्माहून श्रेयस्कर आहे. स्वभावतः नियत

झालेले कर्म केल्यानेच मनुष्याला पाप लागत नाही. हे कुंति पुत्रा सहज कर्म सदोष नसले तरीही सोडता कामा नये. धुराने जास्त अग्नी तसाच सर्व कर्मांचा प्रारंभ करणे दोषयुक्त असते.

**श्लोक ४९ ते ५५ ज्ञाननिष्ठ लोकांचा विचार**

ज्याची बुद्धी कोठेही आसक्त नसते, जो जितेंद्रिय आहे, जो निःस्पृह झाला आहे तो मनुष्य नैष्कर्म्याच्या परमसिद्धीला संन्यासाने प्राप्त होतो.

हे कुंतिपुत्रा, सिद्धीला प्राप्त होणारा मनुष्य ब्रह्माला कसा प्राप्त होतो हे संक्षेपतः मी तुला सांगतो. ही जी बह्माची प्राप्ती ती ज्ञानाची पराकाष्ठा आहे. विशुद्ध बुद्धीने युक्त, धैर्याने आपल्या आत्म्याचे नियमन करून, शब्दादी विषयांचा त्याग करून, रागद्वेषाला जिंकून एकांत सेवन करून, मिताहारी होऊन, मन वाणी आणि शरीर स्वाधीन ठेवून सदैव ध्यानयोगात तत्पर राहून, वैराग्याचा आश्रय करणारा, अहंकार, बल, काम, क्रोध, आणि संग्रह बुद्धीशा सर्वांचा त्याग करून ममता रहित होऊन जो शांतीने युक्त असतो तो ब्रह्मभावाला प्राप्त होतो. ब्रह्मभावाला प्राप्त झालेला मनुष्य प्रसन्नचित्त होऊन कोणाचाही शोक करत नाही आणि कोणाची इच्छाही करीत नाही आणि सर्व भूतमात्राविषयी समभाव धारण करून ईश्वराच्या श्रेष्ठ भक्तीला प्राप्त होतो आणि जितका मोठा आणि जसा ईश्वर आहे तितका आणि तसा तत्त्वतः मला भक्तीने जाणतो आणि माझ्या ठिकाणी प्रविष्ट होतो.

**श्लोक ५६ ते ६६ भक्तीसहित निष्काम कर्मयोग विचार**

ईश्वराचा आश्रय करणारा नेहमी सर्व कर्मे करीत असताही ईश्वराच्या कृपेने शाश्वत आणि अव्यय पदाला प्राप्त होतो.

तू सर्व कर्मे आपल्या मनानेच ईश्वराच्या ठायी समर्पण करून ईश्वरात स्थिर राहून बुद्धियोगचा आश्रय करून सतत ईश्वराच्या ठिकाणी चित्त लाव. तू ईश्वराच्या ठिकाणी चित्त लावून सर्व संकटे माझ्या कृपेनेच पार पाडशील आणि जर तू अभिमानाने ऐकणार नाहीस तर नष्ट होऊन जाशील.

जर अहंकाराचा आश्रय करून सतत मी लढणार नाही असे म्हणशील तर हे म्हणणे मिथ्याच ठरेल. कारण तुझी प्रकृतीच तुला या युद्धात नियुक्त करील. हे कुंतिपुत्रा, आपल्या स्वभावजन्य कर्माने बद्ध झालेला तू मोहाने जे करू इच्छित नाहीस तेच परतंत्र होऊन अवश्य करशील.

हे अर्जुना, यंत्रावर आरूढ झाल्याप्रमाणे सर्व भूतांना आपल्या शक्तीने फिरवीत ईश्वर सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात वास करतो. हे भारता, तू त्यालाच शरण जा. त्याच्या प्रसादाने परमशांती आणि शाश्वत स्थान तुला प्राप्त होईल. हे गुह्यातले गुह्य ज्ञान मी तुला सांगितले. या सर्वांचा चांगल्या प्रकारे विचार करून तुझ्या इच्छेप्रमाणे कर.

सर्वांत अधिक गुह्य असे हे माझे श्रेष्ठ वचन तू पुनः ऐक. तू मला अत्यंत प्रिय आहेस. म्हणून ही तुझ्या हिताची गोष्ट सांगतो. ईश्वराच्या ठिकाणी मन ठेव, ईश्वराचा भक्त हो, ईश्वराला नमस्कार कर, असे केल्याने तू ईश्वराला प्राप्त होशील. ही माझी सत्य प्रतिज्ञा आहे. तू मला प्रिय आहेस म्हणून हे सांगत आहे. तू सर्व धर्म सोडून मला एकट्याला शरण ये. मी तुला सर्व पापापासून मुक्त करीन. तू शोक करू नकोस.

**श्लोक ६७ ते ७८ गीतेची महत्ता**

हे ज्ञान जो तपस्वी नाही, भक्त नाही, जो ऐकू इच्छित नाही अथवा जो ईश्वरद्वेष्टा आहे त्यास कधीही सांगू नकोस. जो हे परम गुह्यज्ञान माझ्या भक्ताना सांगेल तो ईश्वराच्या ठिकाणी दृढ भक्ती करून सर्व संदेहरहित होऊन ईश्वराला प्राप्त होईल. त्यापेक्षा माझे अधिक प्रिय करणारा मनुष्यात दुसरा कोणीही नाही आणि त्याच्याकडून अधिक प्रिय करणारा या पृथ्वीवर कोणीही असणार नाही.

आणि जो आमच्या या धर्मयुक्त संवादाचे अध्ययन करील, त्याने या ज्ञानयज्ञाने ईश्वराची पूजा केली आहे असे माझो मत आहे. श्रद्धावान, द्वेष न करणारा जो मनुष्य त्याचे श्रवण करील तो मुक्त होऊन पुण्यकर्म करणाऱ्यांच्या शुभ लोकांना प्राप्त होईल.

हे पार्था तू हे एकाग्र चित्ताने श्रवण केलेस ना? हे धनंजया, अज्ञानामुळे उत्पन्न झालेला तुझा मोह नष्ट झाला काय ? अर्जुन म्हणाला, हे अच्युता, तुझ्या कृपेने माझा मोह नष्ट झाला. मला स्वकर्माची स्मृती प्राप्त झाली. मी संदेहरहित झालो आहे. आता तुझ्या सांगण्याप्रमाणे करीन.

संजय म्हणाला – मी हा महात्मा पार्थाशी झालेला वासुदेवाचा अद्‌भुत रोमांचकारक संवाद ऐकला. व्यासांच्या कृपेने स्वतः योगेश्वर कृष्णाने सांगितलेले हे श्रेष्ठ गुह्य ज्ञान मी प्रत्यक्ष श्रवण केले. हे राजन, केशव आणि अर्जुन यांचा हा पुण्यकारक अद्‌भुत संवाद मी वारंवार स्मरण करून हर्षित होत आहे. हे राजन, श्रीकृष्णाच्या त्या अद्‌भुत विश्वरुपाचे वारंवार स्मरण करुन मला अत्यंत विस्मय झाला आहे आणि पुनः पुनः आनंदही होत आहे. जेथे योगेश्वर श्रीकृष्ण आणि धनुर्धारी पार्थ आहे तेथे श्री आहे, तेथे विजय आहे, तेथे ऐश्वर्य आहे, तेथेच स्थिर नीतीही आहे. असे माझे निश्चित मत आहे.

हा गीतेचा शेवटचा अध्याय. या अध्यायात मोक्ष संन्यास योग आहे. सुरुवातीलाच संन्यास योगाचा विचार करण्यात आला आहे. गीतेच्या पूर्वकाळी त्याग शब्दाचा अर्थ कर्मत्याग असा करून कित्येक साधक कर्मे सोडून आपल्याला कृतार्थ व त्यागी समजत असत. गीतेने या विचाराला धक्का दिला. हा खरा त्याग नव्हे. ज्या कर्मात सर्व कर्म फळाचा पूर्ण त्याग होतो तोच खरा त्याग. त्याग म्हणजे कर्माचा त्याग नसून कर्मफळाचा त्याग होय. काम्य कर्मे सोडून निष्काम भावनेने केलेले कर्मच संन्यासाचे लक्षण होय.त्यागात सकामता राहतच नाही. म्हणून त्याग हा संन्यासाहून श्रेष्ठ आहे. संन्यासमार्गी म्हणत – यज्ञ, दान, तप हीदेखील काम्य असल्याने ती न करणेच उचित, त्यामुळे या साऱ्या क्रिया बंद झाल्या.परिणामतः सर्व समाज शक्तिहीन झाला. समाजात कष्ट करण्याची प्रवृत्ती कमी होऊ लागली. ही तीनही कार्ये बंद पडल्याने अनर्थ ओढवला. हे समाजधुरीणांच्या लक्षात आले. समाजाच्या संरक्षणासाठी कर्मे आवश्यक आहेत. त्याचबरोबर कर्मबंधनही कमी करता आले पाहिजे हा विचार बळावू लागला. स्वतः कर्मे ही बाधक होत नाहीत. बाधकता कर्मांत नसून कर्मफळ भोगाच्या इच्छेत आहे व इच्छा संयमित झाली तर कर्माची बाधकता दूर होईल. यातून निष्काम कर्म योजना अस्तित्वात आली आणि हा मार्ग कर्मसंन्यासाहून जास्त श्रेयस्कर असल्याने संन्याशी लोकांनाही यातील मर्म समजले व ते पण कर्मफळत्याग करू लागले. अशा प्रकारे संन्यास व त्याग हे शब्द आज समानार्थी झाले आहेत.

कर्मत्यागाचे तीन प्रकार – यज्ञ, दान, तप ही कर्मे त्याग करण्यास योग्य नाहीत. ही कर्मे मनुष्याला हित व सुखकारक आहेत. यांच्या आचरणाने मनुष्याची उन्नती होते. दुसऱ्यासाठी झिजणे हाच यज्ञ. आपण कष्टाने मिळविलेले दुसऱ्यांना देणे हेच दान व दुसऱ्यासाठी कष्ट उचलायास सिद्ध असणे हेच तप होय. यामुळे समाजाची उन्नती होते व आपले अंतःकरण उदार होते. मन शुद्ध होते. अध्यात्माचा मार्ग सुधारतो. आपले कर्तव्य न करता आळसात लोळणे हा तामस त्याग होय. कर्म करताना फार कष्ट झेलावे लागतात. शरीरपीडेपासून स्वतःला वाचविण्यासाठी होणारा कर्मत्याग हा राजस होय. संकटाची पर्वा न करता, फळाची अपेक्षा न बाळगता त्या फळाचा इतरांना फायदा व्हावा या निष्ठेने अथक परिश्रम करणे हा सात्त्विक प्रकारचा त्याग होय. कर्मफळाचा त्याग हा योग्य, मात्र कर्मत्याग हा अयोग्य.

कर्माची पाच कारणे – १) कार्यक्षेत्र २) कर्माचा कर्ता ३) कर्मासाठी विविध साधने ४) विविध क्रिया आणि ५) दैव. अनुकूल वा प्रतिकूल परिस्थिती. प्रत्येक कर्म करताना या पाच कारणांचा त्याच्याशी संबंध येतो. प्रत्येक कारणाच्या उत्तम, मध्यम, कनिष्ठतेमुळे कर्माचे परिणामही तसेच होतात. यावरून कर्माचा कर्ता एकमेव 'मी'च नाही. या पाच कारणांच्या संबंधाशी कर्म सदैव निगडित असते. हे लक्षात येईल. ज्ञान – सात्त्विक – ज्या ज्ञानाने विविध वस्तुमानात अविभक्त भावाचे ज्ञान होते त्याला सात्त्विक ज्ञान म्हणतात. वस्तूत भेद असूनही सर्व व्यापक जीवनात कोणताच भेद असत नाही. विभक्तान

अविभक्ताचे दर्शन करणे हे सात्त्विक ज्ञानाने होते.

राजसज्ञान – प्रत्येक वस्तू दुसऱ्याहून भिन्न आहे. राजस वृत्ती हा भेददर्शी आहे. तामस ज्ञान – वस्तुतः हे अज्ञानच, क्षुद्र, निरर्थक, निःसार अशा कर्मात रमतो त्यांनाच तो महान कर्म समजतो. सात्त्विक कर्म – धर्मानें वा स्वभावतः जे प्राप्त असेल ते त्याचे आवश्यक कर्तव्य होय. तेच सात्त्विक कर्म होय. राजस कर्म – कर्मफळ उपभोगाच्या इच्छेने पुष्कळ आयासाने केले जाणारे कर्म ते राजस होय. तामस कर्म – परिणामाचा विचार न करता, घातपात वा हिंसा याचा विचार न करता अविवेकाने केले जाणारे कर्म सात्त्विक कर्ता – फळेच्छा टाकून कर्म करतो व पूर्णतेला नेतो, सदैव उत्साही असतो तो सात्त्विक कर्ता. राजस कर्ता – आपले भोग वाढविणारा, कर्मफळे आपल्या उपभोगासाठी अधिकाधिक संग्रह करणारा. तामस कर्ता – कर्म करण्याचे कौशल्य नाही, सुस्त आळशी, शठ, कृतघ्न, नीच, चेंगट. सात्त्विक बुद्धी – कोणत्या कर्मात प्रवृत्त व्हावे, कोणत्या कर्मापासून निवृत्त व्हावे कोणते करावे, कोणते करू नये. याचे विवेचक ज्ञान ज्याला होत असते तो सात्त्विक बुद्धीचा.

राजस बुद्धी – धर्माला अधर्म, अधर्माला धर्म समजणारा, कर्तव्य – अकर्तव्य यांसंबंधी विपरीत ज्ञान होते. तामस बुद्धी – धर्यासंबंधी काही ज्ञान नसणे, सत्य ज्ञानाचा पत्ताच नसणे ही तामस बुद्धी.

सात्त्विक धृती – सतत योगसाधनेची आवड, धार्मिक व्रत नियमांचे पालन करण्याची वृत्ती असणे.

राजस धृती – फळभोगाचा इच्छेने धर्मकार्याची योजना, अमुक आचरण, अमुक फल हीच राजस धृती

तामस धृती – निद्रा भीती शोक खिन्नता या दोष युक्त भूमिका तसेच आलस्य हीच तामसी धृती

सात्विक सुख – प्राप्त होताना विषासारखे परिणाम अमृता सारखा.

राजस सुख – प्राप्त होताना अमृतासारख परिणाम विषासारखे

तामस सुख – सुरवात व शेवट मनाला मोहित करणारे प्रमाद, दोष, निर्माण करणारे

या त्रिगुणांचा विचार वाचकांनी करावा. या विश्वात त्रिगुणांचाखेळ सर्वत्र चालू आहे त्यात कोणता गुण विशेष जोर धरत आहे हे पाहावे. विविध प्रकारची कर्मे का घडतात याचे स्पष्ट चित्रण पाहावे. यामुळेच मनुष्याचे चार भाग का पडतात हे ध्यानात येईल. ज्ञान, कर्म, कर्ता, बुद्धी, धृती, सुख या साऱ्या गुणामुळे त्रिविध आहेच हीच विविधता.

चातुर्वर्ण्य – सत्वादी गुणांच्या आधिक्याने ब्राह्मणवर्ग, सत्त्वगुणाकडे झुकणारा रजोगुण आधिक्याने क्षत्रवर्ग, तमोगुणाकडे झुकणारा रजोगुण आधिक्याने वैश्यवर्ण व तमोगुणांचे आधिक्य असलेला शूद्रवर्ण असे तयार झाले. हे वर्ण स्व–भाव–ज आहेत म्हणजे गुणाप्रमाणे कर्म प्रवृत्ती सहज होते. प्रत्येक वर्णाची कर्मे त्यामुळे निश्चित होतात. इंद्रियदमन, धर्मकार्य, तप, पावित्र्य, शुद्धता, आस्तिक्य बुद्धी ही ब्रह्मकर्मे स्वाभाविक आहेत. तेजास्विता, शौर्य, दक्षता, युद्धात स्थिर राहणे हे क्षत्रियाचे स्वाभाविक गुण आहेत. कृषी, गोरक्षण, व्यापारउदीम ही वैश्याची स्वाभाविक कर्मे, परिचर्या, सेवा आदी शूद्राची स्वाभाविक कर्मे.

स्वकर्माने सिद्धी – स्वकर्म अशा रितीने करून परमसिद्धी मानवाला प्राप्त होते. सत्त्व, रज, तम आदी प्रवृत्तीनुरुप जे कर्म निश्चित होते ते त्याचे स्वकर्म होय. सिद्धी याचा अर्थ पूर्ण विकास. आपले कर्तव्य कर्म पालनाने मनुष्याचा विकास होतो. हे स्वकर्म कौशल्याने करावे व कर्मफळे ईश्वराला अर्पण करावीत म्हणजेच जगाच्या कल्याणासाठी कर्तव्यपालन करावे. आपआपल्याला कर्माच्या द्वाराच विश्वरूप परमेश्वराची सेवा करावी. त्यातूनच मानवाला विकास साधता येतो. अनेक रूपांत परमेश्वरच नटलेला आहे. त्या विविध रूपांची मनोभावे सेवा हीच परमात्म सेवा, त्यात देव, पितृ मनुष्य, भूत आदी सर्वांचा समावेश होतो.

प्रत्येक मानवाने निपुणतेने आपली कर्मे करावीत, ती सर्व कर्मे जनसमाजरूपी ईश्वराच्या चरणी अर्पित करावीत. याप्रमाणे जनता जनार्दन सर्वांचे योगक्षेम चालवितो.

विश्वच परमेश्वर, याला अर्पण करणे हीच भक्ती. अशा वेळी भक्ताचे सर्व चित्त ईश्वराच्या ठिकाणी समर्पित होते. त्याच्या सर्व क्रिया ईश्वराप्रीत्यर्थच होत असतात. घमेंडीने जो मानव कर्म करत नाही तो नष्ट भ्रष्ट होतो.

ईश्वर सर्वांच्या हृदयातच आहे. तो हृदयात वास करून तेथून सर्वांना प्रवर्तित करतो. यंत्रावर आरूढ झालेली बाहुली यंत्राच्या गतीने हालचाल करते त्याप्रमाणे या विश्वमनावरील सर्व प्राणी ईश्वरी प्रेरणेने हालचाल करतात. प्रत्येक मानवाने हे ओळखले पाहिजे. मी स्वतंत्र नाही, मी या यंत्राचाच एक भाग आहे, त्याचबरोबर मला फिरले पाहिजे हे ओळखून अहंकार सोडला पाहिजे. विश्वनियामकाच्या साफल्यासाठी स्वतःला समर्पित केले पाहिजे. मी त्याचा आहे. त्याची इच्छापूर्ती करणे यातच माझे कल्याण आहे. त्याच्या संतोषासाठी स्वतःला समर्पित केले पाहिजे. त्याच्या संतोषार्थ आपल्या जीविताचा यज्ञ केला पाहिजे. अशा प्रकारच्या आत्मसमर्पणाने आत्मयज्ञाने मानवी जीविताची सफलता होणार आहे.

हे सत्य ज्ञान झाल्यावर तोच आपल्या इच्छेनुसार कार्य करत आहे हा अनुभव साधक घेतो. कारण त्याची इच्छा ही परमेश्वराची इच्छा असते. तो त्या वेळी परमेश्वरस्वरूपच बनलेला असतो. त्याचे मन परमेश्वराच्या ठिकाणी लागलेले असते. तो ईश्वराचीच सेवा करत असतो. ईश्वरासाठीच तो आत्मयज्ञ करतो. ईश्वरालाच तो नमन करतो. ईश्वरातच तो एकरूप होतो. ईश्वरालाच तो शरण जातो आणि त्याच शरणागतीने तो सर्व पापासून मुक्त होाते. ईश्वररूपात मिळून जातो. याच सत्य ज्ञानाचा प्रचार प्रसार केला पाहिजे. अध्ययन अध्यापन, संकीर्तन, व्याख्यान, लेखन, प्रवचन यांद्वारे हे सत्यज्ञान मनुष्यमात्रापर्यंत पोचले पाहिजे. त्यानेच मनुष्यजातीचे परम कल्याण व्हावयाचे आहे.

हे वचनामृत ऐकूण संजयाच्या शरीरावर रोमांच उभे राहिले. तो धृतराष्ट्राला म्हणाला, राजा, याचे स्मरण करता करता मी प्रमुदित झालो आहे. केशव व अर्जुन यांच्यातील हा अद्‌भुत संवाद ऐकून मी तृप्त झालो. धृतराष्ट्राला याचे काही विशेष वाटले नाही. त्याला एक ध्यास लागलेला आहे, जय कोणाचा होईल. वास्तविक संजय हा पांडव पक्षपाती. त्यानेच राजाच्या सांगण्यावरून शिष्टाईत पांडवांचा बुद्धीभेद केलेला होता. पण त्याचीही दृष्टी निवळली. तो सांगतो, राजा, जिथे श्रीकृष्ण योगेश्वर स्वरूपात आहे, जिथे पार्थ धनुष्याला बाण लावून सज्ज उभा आहे तेथेच जय, ऐश्वर्य आणि न्याय प्रस्थापित होईल. संजयाच्या या सांगण्याला फार मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण हे एक त्रयस्थाचे पक्षपाती माणसाचे मत आहे. अतिशय परखड असे मत राजापुढे त्याने व्यक्त केले आहे.

सर्व योगांचा स्वामी, कौशल्य, समत्वबुद्धी, निष्कामता, निर्लोभता, निर्ममता यांचा आदर्श श्रीकृष्ण जिथे आहे व सर्व प्रकारे अथक परिश्रम करण्यासाठी आपली साधने सज्ज करून पार्थ उभा आहे थोडक्यात ब्रह्मतेज व क्षात्रतेज यांचा समन्वय झाला असेल तिथेच सर्व प्रकारचे ऐश्वर्य, विजय व न्याय्य गोष्ट असणार हे त्रिकालाबाधित सत्यच संजय निर्भीडपणे अभिव्यक्त करीत आहे.

भारतीय जीवनात ज्या ज्या वेळी असा समन्वय घडून आलेला आहे त्या त्या वेळी भारताचे पाऊल पुढेच पडलेले आहे. आर्य चाणक्य-चंद्रगुप्त, ग्रीकांचे वर्चस्व कमी करतात, जुलुमी नंदांचे राज्य उलथून पाडून न्यायाचे राज्य प्रस्थापित झाले. विद्यारण्य-बुक्कराम यावनी सत्ता थोपवून विजयनगर इथे स्वराज्य स्थापित केले. गौडपाद-शंकराचार्य- बौद्ध पाखंडी मताचा निरास करून अद्वैतावर आधारित सनातन धर्माची पुनःस्थापना केली. रामदास-शिवराय - या महाराष्ट्रात सर्वत्र स्वातंत्र्याचा संचार करून हिंदूपदपातशाही निर्माण केली. रामकृष्ण-विवेकानंद - भोगवादी संस्कृतीला थोपवून अद्वैत तत्त्वाानाची ध्वजा त्रिखंडात फडकविली. या वरील उदाहरणांवरून ब्रह्मतेज व क्षात्रतेज यांचा समन्वय होणे किती महत्त्वाचे आहे याचा बोध करून घेऊन योग व कर्म यांची कास धरण्याची वृत्ती या गीतेच्या अध्यायांनी आम्हांस होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**कै. शं. बा. मठ**

●●●

आयुष्याचे सोने करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे अखंड परिश्रम!

# चैत्र मास

*'चैत्र' मासाचे महत्त्व विशद करणारा लेख – संपादक*

हिंदू संस्कृतीनुसार नववर्ष 'चैत्र' मासापासून सुरु होते. हा महिना साधारण एप्रिल–मे दरम्यान येतो. या मासाला नवचैतन्याचा, नवउत्साहाचा मास म्हणतात. वसंतऋतू या मासापासून सुरु होतो. झाडे, वेली, वनस्पती यांना नवीन पालवी फुटते. या मासात अनेक सण, उत्सव येतात.

हिंदू संस्कृतीतील हा चैत्रातील प्रथम आणि महत्त्वाचा सण म्हणजे गुढीपाडवा. चैत्र शु. प्रतिपदेला येणाऱ्या या सणाला गुढीप्रतिपदा असेही म्हणतात. चौदा वर्षांचा वनवास भोगून, रावणवध करून व सीतेची मुक्तता करून श्रीराम या दिवशी अयोध्येस परत आला. काही वर्षांनी याच दिवशी पैठणचा राजा शालिवाहन यानेही परकीयांचा बीमोड करून शालिवाहन शक सुरू केला व त्याचा आनंदोत्सव म्हणून अयोध्यावासी व पैठणच्या लोकांनी गुढ्या उभारून आनंद साजरा केला आणि ही प्रथा सुरू केली. या दिवशी दाराला तोरण लावून उंच गुढी उभारली जाते व तिची पूजा होते. पुराणानुसार याच दिवशी ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली.

चैत्र शु. तृतीयेला सुवासिनी स्त्रिया चैत्रगौरीची स्थापना करतात व ओळखीतल्या सुवासिनींना हळदी–कुंकवाला बोलावतात. हा समारंभ वै. शु. तृतीया म्हणजेच अक्षयतृतीयेपर्यंत चालू राहतात.

चैत्रातील पुढला सण म्हणजे चैत्र शु. नवमी अर्थात रामनवमी होय. श्रीविष्णूंचा ७ वा अवतार व मर्यादा पुरुषोत्तम म्हणून ओळखला जाणारा श्रीराम या दिवशी दु. १२ वा राजा दशरथ व कौसल्या राणी यांच्या प्रासादात जन्माला आला. याच दिवशी त्याचे इतर तीन भाऊ – लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न जन्मास आले. या दिवशी अनेक ठिकाणी रामजन्माचा उत्सव साजरा केला जातो. रावणवध करून श्रीरामाने आपले अवतारकार्य संपवले.

श्रीरामांना सीताशोध व रावणवध या कार्यांत साहाय्य करणारा आणि त्यांचा दूत म्हणून ओळखला जाणारा वायुपुत्र हनुमान चैत्र महिन्याच्या पौर्णिमेस जन्माला आला. अंजनी या वानरीस वायुदेवाच्या आशीर्वादाने पुत्रप्राप्ती झाली व चैत्र. पौर्णिमेस स. ६ वा. हनुमंताचा जन्म झाला. हनुमंताशिवाय रामायण म्हणजे अळणी रामायण असे म्हटले जाते. याच हनुमंताला भगवान शंकराचा अवतार समजले जाते. महाराष्ट्रात अनेक भागांत हनुमान जयंती साजरी होते.

चैत्र पौर्णिमेचे आणखी एक महत्त्व म्हणजे महाराष्ट्रात भारतात हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या छत्रपती शिवरायांची या दिवशी पुण्यातिथी आहे.

अशा प्रकारे चैत्र महिना आणि वसंताच्या आगमनाने समाजात नवचैतन्य निर्माण होते म्हणून हिंदू संस्कृतीत या महिन्यास विशेष महत्त्व आहे.

**नचिकेत सुगवेकर**
जोशी–बेडेकर कला, वाणिज्य महाविद्यालय
द्वितीय वर्ष कला
संस्कृत विभाग

●●●

# 'संस्कृत' - जागतिक दर्जाची भाषा

*संस्कृत भाषेची महती विशद करणारा लेख - संपादक*

संस्कृत ही सर्वांत प्राचीन व जगातील जिवंत अशी भाषा आहे. कित्येक सहस्त्रकांतील तिचा इतिहास फार मनोरंजक आहे. ही भाषा प्राचीन भारतातील वेगवेगळ्या पंथीयांच्या पवित्र ग्रंथांत साकारलेली आहे. ती देवांची भाषा आहे. प्राचीन ऋषिमुनींनी संस्कृत भाषा वेद, उपनिषदे, योगशास्त्रे आणि पुराणांच्या बरोबर पृथ्वीतलावर आणली, असे अनेक संस्कृत पुरातन ग्रंथ, जे बहुतेक काव्यरूपात आहेत, ते त्या वेळची प्रगत संस्कृती, भारतीयांची क्रियाशीलता तसेच आध्यात्मिक परंपरा दर्शवितात. हे विपुल अद्वितीय साहित्य ज्ञानाचा अत्युच्च पल्ला, खोली व जिवंतपणा दर्शवणारे असेच आहे. यातूनच भारतीय एकात्म संस्कृतीची जडणघडण झालेली दिसते.

मुनिवर्य पाणिनींनी सुमारे २६०० वर्षांपूर्वी संस्कृतच्या व्याकरणशास्त्राची पुनर्रचना करून 'अष्टाध्यायी' ग्रंथ लिहिला तो आजही प्रमाणित व आधारभूत मानला जातो. पाश्चिमात्य तज्ज्ञ त्याचे सर्वोच्च मानवी प्रगल्भता म्हणून कौतुक करतात. भाषाशास्त्रज्ञ त्याला एक आदर्श शास्त्रीय ग्रंथ मानतात. व्याकरणशास्त्रज्ञ त्याचा शोध घेऊन म्हणतात की, ती भारतीय व युरोपीय भाषांची तसेच पर्शियन, कुर्दिश व आर्मेनियन भाषांची जननी आहे. विद्ववान संशोधकांनी जगातील ग्रीक, लॅटिन व अरेबिक अशांसारख्या ९० भाषांमध्ये संस्कृतोद्‌भव शब्द आहेत, असे शोधून काढले आहे. संशोधक डॉ. वऱ्हाडपांडे यांनी इंग्रजी भाषेत २५ टक्के शब्द संस्कृतातून आले आहेत, असे दर्शवले आहे. बौद्ध धर्माच्या मिश्र व शुद्ध संस्कृत वाङ्‌मयातून संस्कृत व तत्सम भाषांचा प्रभाव तिबेट, चीन, जपान आणि कोरिया इत्यादी देशांवर झाला. संस्कृत भाषेतील अनेक उसने शब्द थाय, मलाय, आधुनिक इंडोनेशियन, अनेक फिलिपाइन भाषा, जावानीजू भाषा (५०% च्या जवळ) आणि थोड्या प्रमाणात व्हिएटनामीज् भाषेत आढळतात.

संस्कृतमध्ये काव्य, नाटक आणि तत्त्वज्ञाविषयक भरपूर वाङ्‌मय उपलब्ध आहे. या भाषेतून बाणभट्ट, कालिदास भारवी, भास्कराचार्य, चाणक्य आणि आदि शंकराचार्य यांचे व्यक्तिमत्त्व पुढे आले जे जगातील इतर कुठल्याही थोर व्यक्तींच्या तोडीस तोड आहे. संस्कृत भाषा केवळ आध्यात्मिक विषयांचा प्रसार करते, अशी एक भ्रामक कल्पना आहे; परंतु तिच्या वाङ्‌मयात ललितकला, शास्त्रातील अनेक शाखा, साहित्य इ. विषयांवरील म्हणजेच जीवनातील प्रत्येक बाब साकारली आहे म्हणूनच ती एका जागतिक दर्जाच्या भाषेची जाणीव करून देते आणि कोठलेही अद्यायावत शास्त्र व आध्यात्मिक शास्त्र इत्यादींचे माध्यम हाऊ शकते.

रामायण व महाभारत या महाकाव्यांनी अनेक जणांना अनंत काळ प्रभावित केलेले आहे. सुप्रसिद्ध जर्मन कवी गोथे हा तर या महाकाव्यांनी भारावून गेला. न्यूयॉर्कला १९२४ मध्ये इंग्लिश भाषांतरित 'मृच्छकटिकम्' नाटकाच्या प्रयोगाविषयी नाट्यशास्त्र विवेचक जे. डब्ल्यू. कचने उद्‌गार काढले की, ''परिपूर्णतेचे स्थैर्य लाभलेल्या संस्कृतीमधूनच असे नाटक जन्माला येऊ शकते!'' सुप्रसिद्ध भारत अभ्यासक मॅक्समुल्लर म्हणतात, संस्कृत जगातील महान भाषा आहे. जगातील अनेक महान व्यक्ती भगवद्‌गीतेवर अलोट प्रेम करतात. कारण त्यातून आपले ध्येय व त्याप्रत पोचण्याचा मार्ग याची शिकवण मिळते.

आपल्या राज्यघटनेमध्ये ज्या वेदान्त तत्त्वज्ञानाचा अंतर्भाव केला आहे, तो आपण समजून घेतला पाहिजे. त्यात संस्कृत भाषाच क्रियाशील आहे. आज योगशास्त्र,

ध्यानधारण पौर्वात्त्य तत्त्वज्ञान, ताणतणावाचे नियंत्रण आणि होलिस्टिक वैद्यकशास्त्र इत्यादींच्या अभ्यासाबाबत आंतरराष्ट्रीय पातळीवर तीव्र उत्सुकता निर्माण झाली आहे. या सर्व विषयांचे मूळ संस्कृत वाङ्मयात सापडते. या भाषेत शब्दांचे अनेक कोश आहेत. इ.स. ६०० मधील 'अमरकोश' या ग्रंथात एका अर्थाचे अनेक शब्द दर्शवणारे सुमारे ३००० श्लोक आहेत.

संस्कृत ही जगात अशी एकच भाषा आहे की जिच्या अक्षरांतून आणि नादांतून शक्तिशाली मंत्र बनू शकतात. दुसरी कोणतीच भाषा जोम व सामर्थ्यशाली दैविक नाद देऊ शकत नाही. मंत्रोच्चारातून तुमचे व सभोवतालचे संरक्षण होते. इतर भाषांत तालबद्धता, स्वरमेळ व काव्यमय नाद आहेत; परंतु संस्कृतमध्ये हे सर्व असून अधिक काहीतरी आहे. संस्कृत भाषेच्या उच्चारातून सर्वांची वाणी शुद्ध होते. संस्कृतात नाद व खुणा यांत सरळ दुवा आहे, तिच्यात संधी करण्याची सोय असल्याने भाषेच्या वाचनाला गतिसुलभता येते. तिच्यात वर्णमाला व उच्चाार यांत एकवाक्यता असते. तिची वाक्यरचना मुक्त अशी असल्याने शब्द पुढेमागे केले तरी अर्थामध्ये फरक पडत नाही. ती सुरचित व सर्वार्थाने परिपूर्ण आहे. तिच्यात समास (जोडशब्द ) वापरले जातात. तीत अगणित शब्द तयार करण्याचे तंत्र आहे आणि या भाषेत संक्षेपाने वा विस्ताराने दोन्ही पद्धतींनी लिहिता येते. तुलनात्मकरित्या सर्वोच्च पद्धतीने सुरचित असल्याने अद्ययावत संगणकात भाषांतराची यंत्रे आणि नैसार्गिक भाषाप्रक्रिया क्षेत्रात तिचा उपयोग होऊ शकेल, असा जाणकारांचा कयास आहे. निरनिराळे शब्द कसे बनतात ते पाहा–

**उपसर्गेण धात्वर्थो बलात् अन्यत्र नीयते ।**
**प्रहारहार संहार विहार परिहारवत् ।।**

क्रियापदाला विविध उपसर्ग जोडले असता अर्थात बदल होतो. जसे 'हृ' पासून आहार, विदार, प्रहार, परिहार, संहार बनतात.

संस्कृत लोकप्रिय, व्हारात रूढ करण्याकरता अनेक प्रयत्न होत आहेत. १९८१ पासून संस्कृतभारती असरकारी संस्थेने त्यांच्या शिक्षणप्रसारातून याबाबत स्पृहणीय यश मिळवले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सांप्रत जगात ४० लाखांहून जास्त लोक ही भाषा बोलू शकतात. याशिवाय कमीत कमी डझनभर संस्कृत नियतकालिके प्रकाशित होतात; ऑल इंडिया संस्कृत वार्ता प्रसारित होतात. सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ सी. डी. देशमुख आपल्या मित्रमंडळींबरोबर संस्कृतमधून पत्रव्यवहार करायचे. मध्य प्रदेशातील झिरी व कर्नाटकातील मातूर गावातील लोक संस्कृत संभाषण करतात. बौद्धिकरीत्या प्रगल्भ अशा छोटया असंख्य मंडळांत, अनेक शाळांत संस्कृत शिकवले जाते. गेल्या २ शतकांतील शास्त्र व औद्योगिक क्षेत्रांच्या वेगवान भरभराटीमुळे अनेक नवीन शब्दांची भर पडून आता समकालीन संस्कृत भाषा बनली आहे.

लंडममध्ये मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या ब्रिटिश शाळेतील ज्युनिअर विभागात संस्कृत विषय सक्तीचा असून त्यांच्या म्हणण्यानुसार तिच्या अभ्यासामुळे गणित, विज्ञान व इतर भाषा शिकण्यास सुलभ पडते. संस्कृतने पाश्चिमात्य पॉप संगीतातही छोटेसे पदार्पण केले आहे. त्यातून परमेश्वरचिंतन व विश्वशांतीचा संदेश दिला जातो. अनेक देशांतील संस्कृतप्रेमी एकत्र येऊन त्यांनी संस्कृतच्या अभ्यासाकरता एक आंतरराष्ट्रीय संस्था काढली आहे. वेदान्त तत्त्वज्ञानातील 'वसुधैव कुटुम्बकम्' (पृथ्वी म्हणजे एक कुटुंबच आहे), असे त्यांचे ब्रीदवाक्य आहे. त्यांच्यात पहिली संस्कृत विश्व कॉन्फरन्स १९७२ मध्ये नवी दिल्ली येथे आणि अगदी अलीकडची चौदावी कॉन्फरन्स १ ते ५ सप्टेंबर, २००९ ला क्योटो (जपान) येथे भरली होती.

संस्कृत भाषा भारताचे काळीज आहे आणि ती विश्वव्यापी होण्याच्या प्रयत्नात आहे. ती खऱ्या अर्थाने विश्वभाव आहे; परंतु भारताचा आद्य गौरव आणि उच्च परंपरेचे आणि शास्त्र व तत्त्वज्ञानविषयक प्रचंड साहित्याचे आकलन व्हायला हवे असेल तर ती मनापासून अभ्यासली पाहिजे.

**रेवती मिलिंद कुलकर्णी**
जोशी–बेडेकर कला, वाणिज्य महाविद्यालय
द्वितीय वर्ष – कला

●●●

# परिसर वार्ता

– संकलित

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- शैक्षणिक वर्ष २०१४–१५ करता इ. ४ थी तून इ. ५ वीत आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत बुधवार दि. १८/६/२०१४ रोजी चॉकलेट देऊन करण्यात आले.
- मार्च २०१४ मध्ये झालेल्या शालान्त परीक्षेच ९९.६२% निकाल लागला. गुणानुक्रमे व विषयात प्रथम विद्यार्थ्यांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे.
- शालेय वर्ष २०१४–१५ करता पालक–शिक्षक संघाची स्थापना दि. २१/६/२०१४ रोजी चित्रकला वर्गात करण्यात आली.
- श्रीछत्रपती शाहूमहाराजांची १४० वी जयंती दि. २६/६/२०१४ रोजी सकाळ व दुपार विभागात चित्रकला वर्गात साजरी करण्यात आली.


**Results of S.S.C. Board Examination-March 2014**

| Summary | | Result |
|---|---|---|
| No. of Studentds | : | 266 |
| Students Appeared | : | 266 |
| Passed | : | 265 |
| Percentage | : | 99.62% |

**Class**

| | |
|---|---|
| Distinction | 109 |
| I Class | 115 |
| II Class | 38 |
| Pass Class | 3 |
| Fail | 1 |
| **Total** | **266** |

| Percentage | No. of Students |
|---|---|
| 90 & Above | 17 |
| 75 - 90 | 92 |
| 60 - 74 | 115 |
| 45 - 59 | 38 |
| 35 - 44 | 3 |
| Fail | 1 |




### Top Ten

| Sr. No. | Rank | Last Name | First Name | Middle Name | Per % |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | Desale | Shweta | Eknath | 97.20% |
| 2 | 2 | Behere | Swanand | Ravindra | 96.40% |
| 3 | 3 | Sonune | Nilesh | Gopaji | 96.20% |
| 4 | 4 | Bendale | Chetan | Hemchandra | 94.40% |
| 5 | 5 | Sutar | Ruturaj | Harshal | 94.20% |
| 6 | 5 | Shelake | Ahilya | Anant | 94.20% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 6 | Shete | Mayank | Ganesh | 93.80% |
| 8 | 7 | Patil | Sandip | Ananta | 93.60% |
| 9 | 7 | Dabholkar | Rinkita | Prakash | 93.60% |
| 10 | 7 | Rawan | Vibha | Sanjay | 93.60% |
| 11 | 8 | Ramane | Saurabh | Sambhaji | 93.00% |
| 12 | 9 | Gadre | Dipali | Suryakant | 92.60% |
| 13 | 10 | Patil | Khushbu | Dinesh | 92.20% |

**Highest Grades**

| Subject | Last Name | First Name | Middle Name | Marks |
|---|---|---|---|---|
| Marathi | Desale | Shweta | Eknath | 95 |
| Hindi | Gole | Rutukesh | Bhau | 86 |
| Sanskrit | Desale | Shweta | Eknath | 99 |
| | Patil | Khushbu | Dinesh | 99 |
| | Behere | Swanand | Ravindra | 99 |
| | Ramane | Saurabh | Sambhaji | 99 |
| | Dabholkar | Rinkita | Prakash | 99 |
| English | Desale | Shweta | Eknath | 94 |
| Science | Sonune | Nilesh | Gopaji | 97 |
| Maths | Desale | Shweta | Eknath | 99 |
| Social Science | Patil | Durvesh | Raju | 99 |

## जोशी बेडेकर महाविद्यालय

### जून महिन्याचा वृत्तान्त

महाविद्यालयाच्या विनाअनुदानीत अभ्यासक्रमातर्फे तृतीयवर्ष वाणिज्य शाखेसाठी, 'सुधारित अभ्यासक्रम' या विषयांतर्गत एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यशाळेस AD - HOC Board of Studies, Banking and Finance, मुंबई विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाली होती.

AD - HOC, BOS, चे अध्यक्ष व प्राचार्य श्री. ए. डी. वंजारी यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. तसेच विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

डहाणूकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधवी पेठे, डॉ. स्मिता शुक्ला (Alkesh Dinesh Mody, Institute of Management University of Mumbai), डॉ. निशिकांता झा (ठाकूर महाविद्यालय) इत्यादी मान्यवरांचेही कार्यशाळेस मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयातील प्राध्यापकांचे या कार्यशाळेस साहाय्य लाभले. प्राचार्य डॉ. शकुन्तला सिंह यांनीदेखील कार्यशाळेत उत्कृष्ट प्रोत्साहन दिले.

महाविद्यालयात सुरू झालेल्या "SMART", अभ्यासक्रमामार्फत एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक २६ जून २०१४ रोजी करण्यात आले. महाविद्यालयातील प्राध्यापक या कार्यशाळेत वक्ते होते.

Human Skills, या विषयावर प्रा. पूर्वा गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

Social Responsibility - प्रा. सच्चिदानंद सिंह

Rural Marking, Retail Management and Modern Trade - प्रा. श्रद्धा मोने

Distribution and supply chain Management - डॉ. निशिकांता झा

Business Law - प्रा. दीपक मुर्डेश्वर

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुन्तला सिंह व उपप्राचार्य तसेच स्मार्ट अभ्यासक्रमाच्या समन्वयिका डॉ. स्मिता भिडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**संस्कृत विभाग**

महाविद्यालयाच्या संस्कृत विभागातर्फे 'कालिदास दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाअंतर्गत महाकवी कालिदासाच्या 'मेघदूतम्' या काव्याच्या प्रथम खंडाचे रसग्रहण प्रा. स्वाती भालेराव यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी रेवती कुलकर्णी हिने कालिदासाबद्दल उत्कृष्ट माहिती सांगितली. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या संस्कृतच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता.

**व्यास सभा**

व्यास सभा या कार्यक्रमांतर्गत महाविदयालयाच्या सर्व प्राध्यापकांमध्ये प्राचार्यांच्या उपस्थितीत साधक-बाधक चर्चा दर शुक्रवारी प्राध्यापक कक्षात होत असते.

**व्यास सभेत चर्चिलेले विषय**

- ARTICLE - 370
- Modi Govt. Expections and challenges
- The Union Budyet - 2014 -15

व्यास सभेअंतर्गत २७/०६/१४ रोजी छत्रपती शाहू महाराजांची १४० वी जन्मशताब्दी महाविद्यालयात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख श्री. दामोदर मोरे हे या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते होते. त्यांनी शाहू महाराजांच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शकुंतला सिंह यांच्या उपस्थित उत्कृष्ट रितीने हा कार्यक्रम संपन्न झाला.

**June 2013**

| | |
|---|---|
| Total appear | 511 |
| Total Pass | 464 |
| Fail | 47 |

**TYB Com (July 14)**

| | |
|---|---|
| Total appear | 507 |
| Total Pass | 408 |
| Fail | 98 |
| O | 171 |
| A | 140 |
| B | 65 |
| C | 73 |
| D | 33 |
| E | 14 |
| College % | 80.47 |
| University % | |

**Rank Holders TYBcom**

1. Gupta Sharmiladevi - 86.86%
2. Kale Omkar - 86.14%
3. Punmiya Juhi - 86%

**H.S.C. Result**
**XXX - Commerce**

| | Mar 2013 | Mar 2014 |
|---|---|---|
| Total Appear | 613 | 588 |
| Distinction | 102 | 136 |
| 1st Class | 224 | 268 |
| 2nd Class | 200 | 153 |
| Pass Class | 32 | 16 |
| Fail | 55 | 15 |
| Absent | 0 | 0 |
| Percentage of Passing | 91.03% | 97.45% |

**H.S.C. Result**
**XII - Arts**

| | Mar 2013 | Mar 2014 |
|---|---|---|
| Total Appear | 176 | 274 |
| Distinction | 8 | 12 |
| 1st Class | 38 | 73 |
| 2nd Class | 72 | 128 |
| Pass Class | 18 | 25 |
| Fail | 40 | 36 |
| Absent | 0 | 0 |
| Percentage of Passing | 77.27% | 86.86% |

**Rank Holders (HSC)**
**Commerce**

1. Parab Shravani Pradeep - 92.00%
2. Marathe Shruti Suresh - 91.38%
3. Shetty Disha Satish - 89.85%
   Chauhan Shrishti K. - 89.85%

**Arts**

1. Bhattcherjee Aditi Surajit - 86.77%
2. Shenoy Akshata Ashok - 85.77%
3. Sawant Sayali Pradeep - 83.08%

## बांदोडकर विज्ञान विद्यालय

**बा. ना बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या विविध वर्गांत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल खालीलप्रमाणे आहे.**

| इयत्ता | एकूण विद्यार्थी | 'O' श्रेणी प्राप्त विद्यार्थी | 'A' श्रेणी प्राप्त विद्यार्थी | 'B' श्रेणी प्राप्त विद्यार्थी | 'C' श्रेणी प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम वर्ष विज्ञान शाखा | ५११ | ०५ | ९९ | ७६ | ७९ |
| द्वितीय वर्ष विज्ञान शाखा | ३५७ | ३० | ८६ | ९९ | ४५ |
| प्रथम वर्ष माहिती तंत्रज्ञान शाखा | ११५ | ०६ | २६ | १८ | १० |
| द्वितीय वर्ष माहिती तंत्रज्ञान शाखा | १०० | ०२ | १९ | ४० | १९ |

| इयत्ता | प्रथम वर्ग प्रथम श्रेणी | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी | द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | तृतीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|
| अकरावी | ६५ | २०४ | १८३ | १५ | ९७.३०% |
| बारावी | ९० | २०९ | १३१ | ०९ | ९३.३९% |

| क्रमांक | अकरावी | बारावी |
|---|---|---|
| प्रथम | तुलसकर ओंकार (८७.५९%) | जेथे अजय (९०.६२%) |
| द्वितीय | देसाई रोहित (८७.०८%) | पेटरे अमित (८९.२३%) |
| तृतीय | चौधरी महेश (८६.४७%) | गोविलकर मुग्धा (८८.७७%) |

**विषयानुरूप प्रथम विद्यार्थी**

| विषय | अकरावी | एकूण गुण १०० पैकी | बारावी | एकूण गुण १०० पैकी |
|---|---|---|---|---|
| इंग्रजी | आंगणे श्रुती | ९० | चंदनशिप प्रणिता | ८९ |
| मराठी | गुरले नेहा | ८७ | गांवकर शिवानी | ९१ |
| | क्षीरसागर धनश्री | ८७ | पाटील प्रतीक | ९१ |
| | मुथे रेवती | ८७ | | |
| हिंदी | पुजारी अश्विनी | ८४ | मोहिते प्रतीक | ८८ |
| | | | पोलाडिया काजोल | ८८ |
| | | | सिंग नलिनी | ८८ |
| संस्कृत | भिलारे संकेत | ९० | जेधे अजय | ९६ |
| गणित | चौधरी महेश | ९९ | दिघे तुषार | ९८ |
| | सिंग अभिषेक | ९९ | गोविलकर मुग्धा | ९८ |
| | | | मात्रे सयम | ९८ |
| | | | पत्त रुपा | ९८ |
| | | | पेटरे अमित | ९८ |
| भौतिकशास्त्र | चौहान सोहम | ८५ | पेटरे अमित | ९७ |
| | चौधरी महेश | ८५ | | |
| रसायनशास्त्र | देसाई रोहित | ९५ | पेटरे अमित | ९४ |
| | सिंग अभिषेक | ९५ | | |
| जीवशास्त्र | सिंग अभिषेक | ८९ | अय्यर स्नेहा | ९४ |
| पर्यावरणशास्त्र | अडगले विनीता | ४७/५० | | |
| संगणकशास्त्र | अल्शि संजना | १८४/२०० | दिवेकर शुभम | १८७/२०० |

काम छोटे की मोठे हे महत्त्वाचे नसते. ते वेळच्या वेळी करणे महत्त्वाचे असते.

### उद्घाटनपर भाषण

द्वितीय वर्ष व तृतीय विज्ञान शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकरता ९ जून २०१४ रोजी प्राचार्य डॉ. (सौ.) माधुरी पेजावर यांनी उद्घाटनपर भाषण केले. या वेळी त्यांनी बा. ना. बांदेकर विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधा, त्यांना उपलब्ध असलेले अभ्यासक्रम, त्यांचे व्यावसायिक कौशल्य वाढविणारे अभ्यासक्रम, आपल्या महाविद्यालयाच्या परिसरातील विद्या प्रसारक मंडळाच्या अन्य महाविद्यालयांतून उपलब्ध असलेले अभ्यासक्रम यांबाबत सविस्तर माहिती दिली व विद्यार्थ्यांना सर्व सुविधांचा लाभ घेऊन प्रगती साधण्यासाठी आवावहन केले. तसेच मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. आठल्ये यांनी विद्यार्थ्यांनी प्राचार्यांच्या भाषणातून स्फूर्ती घेऊन स्वतःच्या प्रगतीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा असे सांगून विवेकानंदांच्या ''उत्तिष्त, जाग्रत, प्राप्यवरान्नि बोधत'' ह्या संदेशाची आठवण विद्यार्थ्यांना करून दिली.

### अभिनंदन

प्रा. डॉ. मुळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली कु. संघमित्रा रामस्वरूप माटिल हिला वनस्पतिशास्त्रातील डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.) ही पदवी १८ फेब्रु. २०१४ रोजी प्राप्त झाली.

प्रा. श्री. प्रकाश माळी यांना मुंबईच्या जीवनदाता स्वयंसेवी संस्थेने ''राष्ट्रीय प्रतिभारत्न गौरव २०१४'' हा पुरस्कार समाजसेवा, कलासेवा, पत्रकारिता या क्षेत्रांतील प्रशंसनीय कार्याबद्दल प्रदान केला. तसेच माळीसरांना हिंदवी स्वराज्य संघटना, मुंबई यांच्याकडून राष्ट्रविकासाच्या (शैक्षणिक) कार्यातील प्रशंसनीय कामगिरीबद्दल ''राज्यस्तरीय प्रबोधन सेवा रत्न पुरस्कार २०१४'' प्राप्त झाला. माळीसरांनी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेकडून पब्लिक रिलेशन ऑफिसर म्हणून २०१४-१५ वर्षासाठी नेमणूक झाली आहे.

कु. स्नेहा रामप्रसाद अदेण या विद्यार्थिनीला राष्ट्रीय पर्यावरण गुणवत्ता शोध परीक्षेत (NETSE) सुवर्णपदक प्राप्त झाले. ह्या परीक्षेच्या आयोजनातील सहकार्याबद्दल सर्व प्राध्यापक माळी, साबळे, आठवले, धुमाळे, थोरात यांचे मल्लीनाथ आंतरराष्ट्रीय फाउंडेशन (पृथ्वी व पर्यावरण) तर्फे विशेष आभार मानण्यात आले आहेत.

प्रा. डॉ. रत्नम यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुधीर जयसिंग मंगल मोहिते यांना २९ मार्च २०१४ रोजी डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.) ही पदवी प्राप्त झाली.

प्रा. डॉ. रत्नम यांना दि. १३.४.२०१४ रोजी फिजिकल सायन्स इंटरनॅशनल जर्मन ह्या आंतरराष्ट्रीय जर्मनच्या रिसर्च पेपरचे परीक्षक म्हणून काम करण्याचा मान मिळाला.

प्राध्यापक सर्वश्री लाड, मंजिरी रानडे, प्रकाश माळी, चंचल यादव, धुमाळे व अनिल आठवले यांना गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव यांच्याकडून फाउंडेशनच्या परीक्षेचे काम केल्याबद्दल प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले आहे.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### मे २०१४

**MH-CET**

दि. ८ मे २०१४ रोजी महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात आलेल्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेचे (MH-CET-2014) चे आमचे महाविद्यालय एक परीक्षा केंद्र होते.

### विद्यापीठाच्या परीक्षा

आमचे विधी महाविद्यालय विद्यापीठाच्या विधी अभ्यासक्रमाच्या सत्र २,४,६ च्या परीक्षेचे केंद्र होते. सदर परिक्षा २० मे पासून सुरू झाल्या.

यशस्वी होण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे दीर्घोद्योग.

**सहविचार सभा**

रविवार दिनांक १८ मे २०१४ रोजी सकाळी ११ वाजता C.K.T. महाविद्यालय, पनवेल येथे विभागीय सरसंचालक व प्राचार्यांची सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार ह्या उपस्थित होत्या.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतुदीनुसार राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्तेमध्ये वाढ व संवर्धन करून राज्यातील विद्यार्थ्यांना चांगल्या व दर्जेदार प्रतीचे शिक्षण उपलब्ध करून देण्यामध्ये बरीच महाविद्यालये कमी पडली असून त्या संदर्भात नागपूर उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. २४४४/२०१३ व २४४६/२०१३ नुसार शासनाने / संबंधितांनी विहित केलेल्या निकषांची पूर्तता केली नसल्याचे स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर शासन स्तरावरून विभागीय सहसंचालकांकडून राज्यातील उच्च शिक्षणातील गुणात्मक सुधारणा व सोयीसुविधांची तपासणी करण्याचे आश्वासन विधानमंडळास देण्यात आले. त्या संदर्भातील तपासणीबाबतचा विहित नमुना U.C.D. मध्ये सादर करण्यात आला व दिनांक २६ मे २०१४ रोजी विभागीय सहसंचालकांचे प्रतिनिधी म्हणून जोगेश्वरीच्या इस्माइल युसूफ महाविद्यालयाचे डॉ. राजेंद्र कलेश, साहाय्यक प्राध्यापक यांनी व्यक्तिशः महाविद्यालयातील सोयीसुविधांची तपासणी केली.

**जून २०१४**

• CAP for LLB Exam - CAP चे काम दि. २५ जून २०१४ रोजी संपले असून एकूण ३८९३ उत्तरपत्रिका तपासणीकरता आल्या होत्या.

• वार्षिक दिनदर्शिका – २०१४–१५ ची वार्षिक दिनदर्शिका विद्या प्रसारक मंडळाच्या कार्यालयात दि. १४ जून रोजी पाठविण्यात आली.

• प्रवेशप्रक्रियेची तयारी – प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष व तृतीय वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेची तयारी पूर्ण झाली असून पुनःतपासणीच्या आधारावर द्वितीय व तृतीय वर्षाच्या आधारावर प्रवेश दिला जात आहे. प्रवेशप्रक्रिया समिती स्थापन करण्यात आली असून प्रवेशप्रक्रिया अर्ज, अभ्यासक्रम व प्रात्यक्षिक पुस्तिका छापल्या आहेत.

मुंबई विद्यापिठांकडून प्रवेशप्रक्रियेसाठी देण्यात येणाऱ्या Online Registration link देण्यास उशीर झाल्यामुळे महाविद्यालयाकडून Online form upload करण्यास उशीर झाला. तरीदेखील महाविद्यालयाकडून १९ जून २०१४ रोजी संकेतस्थळावर प्रवेशप्रक्रिया अर्ज दाखल करण्यात आला.

स्थायी व्यवस्थापन समिती – स्थानिक व्यवस्थापन समिती (कलम ८५, महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ॲक्ट) व विधी महाविद्यालय व्यवस्थापकीय समिती ह्यांच्यामध्ये दि. २७ जून २०१४ रोजी सभा झाली.

**सर्व विधी महाविद्यालयातील प्राचार्यांची सभा**

प्रवेश प्रक्रियेबाबत चर्चा करण्यासाठी सर्व विधी महाविद्यालयांतील प्राचार्यांची दि. २८ जून २०१४ रोजी दु. १२.०० वा. बैठक झाली. प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार ह्यादेखील या बैठकीसाठी उपस्थित होत्या.

**पोलीस हवालदार प्रशिक्षण**

विभागीय उपआयुक्त राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे ह्यांनी केलेल्या विनंतीस मान देऊन महाविद्यालयातर्फे प्राध्यापक ॲड. श्री. अंबर जोशी हे पोलीस हवालदारांना जुलै आणि ऑगस्ट महिन्यात भिवंडी येथे प्रशिक्षण देण्यासाठी जाणार आहेत.

## १ मे २०१४ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व संस्थांतर्फे ध्वजवंदन

**प्रमुख पाहुणे प्रा. दि. कृ. नायक, प्राचार्य, विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे यांनी त्यानिमित्ताने केलेल्या भाषणाचा गोषवारा**

मुंबईसह महाराष्ट्र स्वतंत्र विभाग झाला त्याच्या स्मरणार्थ १ मे हा महाराष्ट्र दिन म्हणून साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र एक स्वतंत्र राज्य म्हणून गणले जाऊ लागले. आज आपण ५४ वा महाराष्ट्र दिन साजरा करत आहोत. लोकसंख्या आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र हे एक मोठे राज्य आहे. परराष्ट्रीय व्यापार आणि पर्यटकांचा महसूल यांतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा देशाच्या महसुलामध्ये मोठा वाटा आहे.

भारतात मुंबई हे द्विभाषिक राज्य म्हणून ओळखले जात असे. १९५६ च्या राज्याच्या पुनर्बांधणी कायद्यान्वये प्रत्येक राज्याच्या भाषेप्रमाणे सीमा आखल्या गेल्या. परंतु मुंबई हे द्विभाषिक असूनदेखील त्यात गुजराती, कच्छी, मराठी आणि कोकणी भाषिक समाविष्ट करण्यात आले.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चळवळीमुळे महाराष्ट्र राज्याची भाषिक विभागणी दोन राज्यांत झाली ती म्हणजे महाराष्ट्र आणि गुजरात. भारताच्या संसदेमध्ये मुंबई पुनर्बांधणी कायदा हा २५ एप्रिल १९६० रोजी अस्तित्वात आला आणि या कायद्याची अंमलबजावणी १ मे १९६० पासून झाली म्हणून १ मे हा महाराष्ट्र दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस शिवाजी पार्क येथे साजरा केला जातो. या वेळी महाराष्ट्राचे राज्यपाल समारंभपूर्वक राज्य राखीव पोलीस दल, बृहन्मुंबई कमांडो फोर्स, होमगार्डस्, नागरी संरक्षण दल, अग्निशामक दल आणि नागरी पोलीस यांचे वंदन स्वीकारतात.

औद्योगिक प्रगती, परराष्ट्रीय गुंतवणूक आणि वैयक्तिक भरीव मिळकत या सर्वांमुळे गेल्या ५० वर्षांत या राज्याने केलेली प्रगती ही प्रशंसनीय आहे. महाराष्ट्राचे खरे बलस्थान म्हणजे येथील रहिवासी हेच आहेत. स्वातंत्र्य चळवळीत अग्रणी असलेले नेते – जसे बाळ गंगाधर टिळक, गोपाळकृष्ण गोखले हे महाराष्ट्रातीलच होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचेही नेते यशवंतराव चव्हाण, बॅरिस्टर नाथ पै, एस. एम. जोशी, मधू लिमये, मधू दंडवते आणि इतरही हेही महाराष्ट्रातीलच आणि त्यांनीही महाराष्ट्राच्या प्रगतीला निःस्वार्थीपणे हातभार लावला.

१९६० मध्ये साक्षरतेचे प्रमाण हे ३५% होते, परंतु आता त्यात भरीव वाढ होऊन ते ८३% पर्यंत पोहोचले आहे. शेतकी धोरणात घरगुती उत्पादनांत मात्र आपण प्रगती करू शकलेलो नाही. आपली पत खालावलेली आहे कारण बांधकाम पद्धती आणि अकार्यक्षमता कार्याकारणांमुळे आपण यात प्रगती करू शकलो नाही.

ज्या राज्यात महात्मा जोतिबा फुले, बाबासाहेब आंबेडकर, जस्टिस एम. जी. रानडे यांसारखे नेते होते तसेच आताही असेच नेते व्हावेत अशी अपेक्षा आहे. चांगले शैक्षणिक आणि प्रागतिक नेतृत्व दिसत नाही आणि आपल्या समाजासाठी काय योग्य आहे, काय नाही याचा विचार न करता आपण बाकीच्यांचेच अनुकरण करतो. याचा आपल्या सुशिक्षित तरुण पिढीवर आणि नैतिक मूल्यांवर फार मोठ्या प्रमाणावर परिणाम दिसून येत आहे.

भाषणाच्या शेवटी मी अशी आशा व्यक्त करतो की आपल्या समाजासाठी विविध स्तरांवरून भरीव आणि विचारी नेतृतव मिळो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र!

●●●

# विद्या प्रसारक मंडळ

विष्णुनगर, नौपाडा, ठाणे ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५४२६२७०

भारतातील महान गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ भास्कराचार्य यांच्या सन्मानार्थ ठाणे येथील विद्या प्रसारक मंडळ या संस्थेने त्यांचे ९०० वे जन्म वर्ष साजरे करायचे ठरविले आहे. त्या निमित्ताने तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे.

अनेक पिढ्या ज्योतिषशास्त्राची परंपरा असणाऱ्या विद्वान कुटुंबात भास्कराचार्यांचा इ.स. १११४ साली जन्म झाला. सर्व ज्ञानशाखांत नैपुण्य मिळवल्यावर त्यांनी गणित व खगोलशास्त्राच्या साहित्यात मोलाची, महत्त्वाची भर टाकली. विषयाची परिपूर्ण हाताळणी, साहित्याचे विचारपूर्ण संगठन केले आणि विषय स्पष्टपणे मांडले. त्यांच्या नंतरच्या शतकांतील विषयाच्या विकासावर प्रभाव पडल्याचा दिसतो. भास्कराचार्यांच्या साहित्याचा सर्व देशांत अभ्यास केला जातो व त्यावर अनेक प्रकारचे टीकात्मक व अभ्यासपूर्ण साहित्य निर्माण केले जाते.

# भास्कर ९००

## आंतरराष्ट्रीय परिषद

## भास्कराचार्यांच्या ९०० व्या जन्म वर्षनिमित्ताने

विबुधाभिवन्दितपदो जयति श्रीभास्कराचार्यः

**शुक्रवार दि. १९; शनिवार दि. २० आणि रविवार दि. २१ सप्टेंबर २०१४**

स्थळ :
थोरले बाजीराव पेशवे सभागृह,
ज्ञानद्वीप, ठाणे महाविद्यालय परिसर,
चेंदणी, बंदर रोड, ठाणे, महाराष्ट्र, भारत – ४०० ६०१

http://www.vpmthane.org/bhaskara900/

भास्कर ९००

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.